**Political Leadership and Communication**

# घटक १
# राजकीय नेतृत्व

**अनक्रमणिका**


१.१ उद्दिष्ट्ये

१.२ प्रास्ताविक

१.३ विषय विवेचन

१.४ नेतृत्व संकल्पना

 १.४.१ नेतृत्वाचा स्वरूप आणि घटक

 १.४.२ नेतृत्वाचा संकल्पना आणि सामाजिक उत्पती

 १.४.३ नेतृत्वाचे प्रकार

 १.४.४ राजकीय नेतृत्वाची भूमिका आणि कार्य

 १.४.५ राजकीय नेतृत्वाचे बदलते स्वरूप

१.५ सारांश

१.६ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.७ स्वाध्याय

 अ. अध्ययनासाठी प्रश्न

 ब. स्वंय अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे

१.८ अधिक वाचनासाठी स्वाध्याय


## १.१ उद्दिष्ट्ये :

१. नेतृत्व संकल्पच्या माध्यमातून समाज आणि राजकीय व्यवस्थेचे आंतरसंबंध समजून घेणे.

२. राजकीय नेतृत्वाला अनेक भूमिका पार पाडाव्या लागतात त्या अभ्यासणे.

३. राजकीय नेतृत्वाचे आधारभूत घटक अभ्यासणे.

४. लोकांच्या राजकीय सहभागाचे प्रमाण वाढत आहे लोकशाहीच्या विकासाबरोबरच, राजकीय सहभागाच्या विविध संधी आणि माध्यमे नागरिकांना उपलब्ध होतात का ते अभ्यासणे.

५. नेतृत्व ही राज्यव्यवस्थेच्या अंतर्गत चालणारी प्रक्रिया आहे तिचे स्वरूप कसे आहे समजून घेणे.

६. राजकीय नेतृत्वाच्या कार्याचा विचार आल्मंडप्रणित रचनात्मक कार्यवादाच्या आधारावर कोणत्या पद्धतीने झाला ते समजून घेणे.

## १.२ प्रास्ताविक :

जीवन जगत असताना प्रत्येक जनसमूहाला त्याच्या उत्कर्षासाठी कर्त्या व्यक्तीची गरज असते त्या' कर्त्या व्यक्तीचे आदर्श आणि त्यांनी दिलेले मार्गदर्शन प्रभावाने कोणताही समाज कठीण प्रसंगातून मार्ग काढून तो आणि समाज प्रगती करू शकतो. लोकशाही व्यवस्था मध्ये सामूहिकरीत्या निर्णय प्रक्रीया योग्य असली तरी त्यामुळे निर्णय प्रक्रियेतील अग्रभागी असणाऱ्या नेतूत्वाचे महत्व कमी होत नाही. लो. टिळकांच्या मते वेदकाळात भारत एक स्वयंपूर्ण व महान राष्ट्र होते. अनेक गणराज्याचा कारभार लोकशाही पद्धतीने चालत असे भारताचे सांस्कृतिक तथा सामाजिक जीवन समृद्ध होते. भारतात वैशिष्ट्यपूर्ण राष्ट्रीय एकता होती. परंतु कालांतराने ही एकता अदृश्य झाली आणि देशाच्या पतनाला सुरवात झाली पुढाऱ्यानी त्या एकतेचे पुनरुज्जीवन करावे ज्याप्रमाणे श्रीकृष्णाने भगवद्गीतेमध्ये म्हटले आहे की, 'यदा यदा ही धर्मस्य ग्लानीर्भवती भारत। अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानम् सृजाम्यहम् ।। अर्थात् भारतात जेव्हा जेव्हा धर्माला उतरतीकळा लागते, धर्माच्या उत्थानासाठी मी जन्म घेतो. म्हणजे लोकनेत्याला धर्माची स्थापना करावयाची असते या समाजधर्मातून राष्ट्राची एकता निर्माण करणे हाच राजधर्म असून त्याच्याशी पुढाऱ्याची बांधिलकी असते.

## १.३ विषय विवेचन:

राजकीय नेतृत्व हा शब्द साक्षरते पासून निरक्षरापर्यंत सर्वांनाच तो परिचित आहे. याचा अर्थ उत्कर्षासाठी कर्त्या व्यक्तीची गरज असा होतो. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे नेतृत्व, संभाजी महाराजांचे नेतृत्व, शाहू महाराजांचे नेतृत्व, सयाजी महाराजांचे नेतृत्व, गांधीजींचे नेतृत्व, लिंकनचे नेतृत्व अशा अर्थानं गेल्या हजारो वर्षांपासून जगाच्या कानाकोपऱ्यामध्ये अनेक लहान थोर नेतृत्व होऊन अजरामवर झाले त्यांच्या चरित्रात्मक ग्रंथांनी आणि आत्मकथांनी ग्रंथालय समृद्ध असलेली दिसून येतात. आणि ते समाजासाठी मार्गदर्शक असलेले दिसून येतात अशा प्रकारे नेतृत्वाचा अभ्यास म्हणजे पुढाऱ्यांच्या चरित्राचा व कार्याचा अभ्यास अशी सर्वसाधारण धारणा असते अगदी विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत नेतृत्व विषयाकडे शास्त्रज्ञाची पुरेसे लक्ष नव्हते अमेरिकेसारख्या पुढारीलेल्या देशातील न्यूयॉर्कच्या विशाल गणतंत्र ग्रंथालयामध्ये ४० वर्षांपूर्वी लीडरशिप या मथळ्याखाली केवळ एकच पुस्तक आढळून आले होते परंतु पंचवीस तीस वर्षाच्या काळामध्ये नेतृत्वावर देश-विदेशामध्ये विपुल असे संशोधन पर लेखन निर्माण झाले. वेदकाळापासून हाच प्रकार आढळतो स्मृती ग्रंथामध्ये समाजाच्या सर्व संघाच्या व संपूर्ण समाजाच्या धारणेला उपयुक्त अशा रचना दिलेल्या आहेत. म्हणून राजधर्म राज्यसत्ता विहीन नैतिक नेत्यांनी बनवलेले परंतु राजनेत्याला बंधनकारक ठरतील असे नियम म्हणजे राजधर्म होय. महाभारतातील शांतीपर्वात राजधर्माचा विचार सांगण्यात आलेला आहे. प्रत्येक कालखंडामध्ये जे पुरुष होऊन गेले मग ते अवतार म्हणून मानले गेले असो किंवा नसो त्याचे जीवनाचे व्यवहाराची चारित्र्याचे वर्णन करीत असताना श्रेष्ठ नेतृत्वाला आवश्यक अशा गुणांचे वर्णन लेखकांनी केलेले दिसून येते. नेतृत्व संकल्पना भूतकाळातील राजापासून तर वर्तमान काळातील राजनेतेपर्यंत सर्वांचा यामध्ये समावेश होतो. राज्यव्यवस्थेच्या औपचारिक तथा अनौपचारिक स्वरूपात नेतृत्वाचा प्रकार अवलंबून असतो नेतृत्वाच्या बदलत्या प्रकारामुळे राज्यव्यवस्थेचे स्वरूप आकार साकार

होऊ शकते. स्वतंत्रपूर्व काळात देखील भारतीय नेतृत्वाचे स्वरूप उदारमतवादी लोकशाही असल्यामुळे संसदीय पद्धतीची लोकशाही राज्यघटना निर्माण करण्यात आली. म्हणूनच प्रस्तुत घटकांमध्ये नेतृत्वाच्या संकल्पना नेतृत्वाचे घटक, तिचे सामाजिक उत्पत्ती, नेतृत्वाचे प्रकार, नेतृत्वाची भूमिका आणि कार्य त्याचबरोबर राजकीय नेतृत्वाचे बदलते स्वरूप याविषयी चर्चा करण्यात येणार आहे.

## १.४ नेतृत्व संकल्पना :

व्यक्तीसमुहास संकटात किंवा अस्थिरता असलेल्या काळात प्रत्येक व्यक्तीला स्वसंरक्षणासाठी आधार आणि पाठिंबाची गरज असते त्या काळात आपले रक्षण करण्यासाठी आपल्याहून प्रबळ, शूर वा हुशार नेतृत्व आपल्याजवळ असल्यास आपला आत्मविश्वास वाढतो. म्हणूनच नेतृत्वाशिवाय समाज आणि राजकीय व्यवस्थेची कल्पना करता येणार नाही. एकंदरीत युद्ध, चळवळ, बंड, क्रांती किंवा सुधारणा राजकीय नेतृत्वाखेरीज यशस्वी होत नाहीत. राजकीय प्रमुख नेतृत्वक्षम असेल तरच त्याचे कार्य सुफल ठरण्याची शक्यता असते कारण राजकीय नेत्याचे यशापयश त्याच्या निर्णय शक्तीवरच पारखले जाते. वेबस्टरने मते नेतृत्व म्हणजे अशी व्यक्ती की जी समूहाला निर्देश देते, आज्ञाकिंत करते अथवा प्रमुख म्हणून मार्गदर्शन करते. मॅक्स वेबरने मात्र पुढारी व नेतृत्व ह्या शब्दात फरक केला आहे त्याच्या मते स्वतःच्या व्यक्तिगत गुणाच्याद्वारे तथा त्याला प्राप्त होणाऱ्या साधन स्रोत ह्याच्यावरील नियंत्रणामुळे जो समुहात्तील लोकांना प्रोत्साहित करून त्यांच्या वर्तनाला प्रभावित करू शकतो त्याला ढोबमानाने नेता म्हणता येते. तर 'नेतृत्व म्हणजे, अशी पद्धती जिच्यामध्ये पुढारी विशिष्ट सदर्भात आपल्या शैलीद्वारा प्रभावाचा उपयोग करतात.

### १.४.१ नेतृत्व अर्थ स्वरूप घटक

नेतृत्व हे विकसित होण्यासाठी नेतृत्वाची समाजासाठी असलेली गरज आणि त्यांची नैसर्गिकता लक्षात घेता प्रत्येक समाजात नेतृत्व हे विकसित होत असते; म्हणूनच ही मानवाची नैसर्गिक गरज असते. नैसर्गिक आणि राजकीय हेतूसाठी नेता आणि कार्यकर्ता ह्या दोन गटात समाजाचे विभाजन होते त्यांचे आधुनिक काळात सत्ताधारी व सत्ताहीन असे केले जाते. ज्या देशात लोकशाही असते तेथे देखील सर्व नागरिक सत्ता गाजवितात असे नाही म्हणजे प्रत्यक्ष सत्ता गाजविणारे थोडे लोक असतात अर्थात ते सर्वांच्या वतीने गाजवितात त्यांना श्रेष्ठीजन (Executive Elite) असे म्हणतात. नेतृत्व हा असा गुण आहे जो संघटितपणे कार्य करणाऱ्या लोकांना त्यांच्या कार्यास मार्गदर्शन करतो व लोकांना प्रभावित करून त्यांच्या संबंधित उद्दिष्ट्ये साध्य करणारी कृती पार पडत असते. 'नेतृत्वाच्या व्याख्या विविध विचारवंतांनी खालीलप्रमाणे केल्या आहेत.

**१. मराठी विश्वकोषामध्ये –** नेतृत्व संकल्पनेचे वर्णन म्हणजे पुढारीपण असा अर्थ सांगून, 'समूहाचे उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी अनुयायी म्हणवल्या जाणाऱ्या लोकांना एकात्मतेने वागण्यास उत्तेजन देणारी ही एक वागण्याची पद्धत म्हणजेच नेतृत्व होय'

**२. लॉर्ड लॉयडची –** 'नेतृत्व ही पुढारी बनण्याची व कायम राहण्याची कला नसून पुढाकार घेण्याची कला (Art of Leading) आहे

**३. आर एम स्टॉगडोलने–** यांच्या मते 'नेतृत्व म्हणजे केवळ काही गुणाचा समुच्चय अथवा निष्क्रिय स्थिती नसून, समूहातील परस्पर संबंधावर अवलंबून असते'.

**४. रिचर्ड सी स्निडर व पेग–** यांच्या मते 'नेतृत्व म्हणजे निर्णय घेणाऱ्या प्रक्रियेला नेतृत्व म्हटले आहे'.

**५. जेम्स मॅक ग्रागर –** याच्या मते, 'शक्ती व राजकारण जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत आणि नेतृत्व व्यापक शक्ती प्रक्रियेचा एक भाग आहे 'नेतृत्व स्वतःच एक प्रक्रिया असून व्यापक अशा राजकीय प्रक्रियेचा एक भाग असते'

**६. आलमंड** – 'याच्या मते, राजकीय नेतृत्व म्हणजे  योग्यता, संसूचन आणि उद्देश ह्या तीन घटकांना महत्त्व असून त्याच्या परस्परावरील क्रियाप्रतिक्रियेतून नेतृत्व साकार होते.'

नेतृत्व हे आकाराला येण्यासाठी आर एम स्टॉगडोलने Meaning of Leadership Traits or Representation ह्या लेखात म्हटले आहे की, व्यक्ती– 'व्यक्तीच्या परस्पर संबंधावर नेतृत्वाची संकल्पना अवलंबून असल्याचे मत स्टॉगडील, सेलिगमन तथा श्मीड प्रमाणेच मायरन वाईनर, डेविस ह्यांनी मान्य केली आहे. 'नेतृत्व म्हणजे सामान्य हितसंबंधावर आधारित अशा व्यक्ती व समूहातील संबंध असून त्या पुढारी व्यक्तीच्या मार्गदर्शनाने ते निश्चित होतात पुढाऱ्याच्या केवळ गुणाच्या आधारावर एकूण राजकीय परिस्थितीचे आकलन होत नाही दुसरे म्हणजे पुढाऱ्याचे नेतृत्वगुण कायम असूनही परिस्थितीमध्ये बदल होताच त्यांच्या नेतृत्वाचा लोप होतो जसे लालकृष्ण अडवाणींच्या नेतृत्वगुणांस पक्षांतर्गत शह देण्याचे कार्य नरेंद्र मोदींनी केले.

**राजकीय नेतृत्वाचे स्वरूप :**

प्राचीन तसेच मध्ययुगीन काळातील भारतीय सिद्धान्तानुसार राजनेत्याला अभिषेकाच्या वेळी 'धर्मदंडयोस्मि' अशी शपथ घ्यावी लागत असे अशाप्रकारे भारतीय सिद्धान्तानुसार नेता धर्म अथवा नियमांना जबाबदार असतो विशिष्ट मूल्याशी बांधिलकी असल्याचे मानले जात असे. साम्यवादी सिद्धान्तानुसार पुढारी शासकीय श्रेष्ठीना (Elites) जबाबदार असतो पाश्चात्य मतानुसार पुढारी त्याच्या गटाला किवा पक्षाला जबाबदार असून प्रत्यक्ष व्यवहारात संसदेतील बहुमताला जबाबदार असतो.

राजकीय नेतृत्वाविषयी स्वरुपाचे प्रारूप डाल्हने शक्ती दृष्टीकोणाचा उपयोग करून नेतृत्वाच्या विषयी सुचविले आहे. राजकीय मानव (Political Man) ह्या प्रकरणात डाल्हने शक्तीसंपत्र, सत्ताकांक्षी, राजकीय संरचना व अराजकीय संरचना असे चार समूह सांगितले आहेत त्या वर्गीकरणातून 'शक्तीसंपत्र व सत्ताकांक्षी हे राजकीय पुढारी आहेत. त्यांचा राजकीय 'निर्णयावर प्रभाव' पडतो, कारण त्याच्याजवळ राजकीय स्रोत व कौशल्य अधिक प्रमाणात असते.

शक्तीसंपत्र                    सत्ताकांक्षी

राजकीय नेतृत्व

राजकीय संरचना                    अराजकीय संरचना

राजकीय नेतृत्वविषयी लास्वेलने 'Power and Personality' ह्या ग्रंथात राजकारणावर भाष्य करताना पुढील विधान केले आहे 'Who gets, what, when and How' (१९३६) ह्यावरून नेतृत्वाचाच बोध होतो. त्याने नेतृत्त्वाची व्याख्या 'Policy Scientist' ह्या शब्दात केली आहे. The future of Political Science (१९६३) मधील 'Leadership Role' च्या इंडेक्समध्ये लास्वेलने नेता व नेतृत्वाची व्याख्या करताना म्हटले आहे की, ‘सार्वजनिक कार्यात प्रभावी सहभाग घेणारा तो पुढारी होय. नेतृत्व हे सल्ला देणे, व्यवस्था करणे तथा उद्दिष्ट ठरविणे, समन्वय साधणे ह्यापेक्षा अधिक काही आहे. क्रियाशील राजकारणी येतात. डेविड ह्यूमच्या त्याच्या मते कोणत्याही पुढाऱ्याला सर्व लोकांची निष्ठा प्राप्त होत नसते बहुतेक नेत्यांना विशिष्ट हितसंबंधावर आधारित अशा मर्यादित गटाच्या, संमतीवर पुढारीपण प्राप्त होते समाज हा विभिन्न हितसंबंधाच्या परस्पर स्पर्धेवर आधारित असतो, हा पाश्चात्य विचार अस्पर्धात्मक तथा एकमेव राजकीय शक्तीचा स्रोत मानणाऱ्या भारतीय विचारांपासून एकदम भिन्न आहे.

राजकीय नेतृत्व ही संकल्पना सर्वंकष राष्ट्रात विचारधाराच्या आधारावर नेते आपली सर्वश्रेष्ठ सत्ता प्रस्थापित करतात. एखाद्या संघटनेद्वारे राष्ट्रांत एकता प्रस्थापित करण्याचे कार्य नेत्याला करावे लागते. मात्र लोकशाही व्यवस्था मध्ये राजकीय नेतृत्व हे जनतेला नेतृत्व देण्याची जबाबदारी शासकीय नेतृत्वावर असते. कार्यकारी मंडळ केवळ शासनाची एक शाखा म्हणून महत्त्वाची नसून सर्व राजकीय व्यवस्थात एक महत्त्वाची यंत्रणा आहे. कार्यकारी मंडळामार्फत कायदेमंडळाली केलेले कायदे आणि न्यायमंडळाने दिलेल्या निकालाच्या अंमलबजावणीची जबाबदारी पार पाडली जाते. त्यामुळे आधुनिक काळात कार्यकारी मंडळाचे महत्त्व व जबाबदारी वाढलेली आहे. राजकीय नेतृत्व देखील कार्यकारीमंडळात विकसित होत असते. भारतातील लोकशाहीच्या यशात पंडित नेहरुच्या नेतृत्वाचा मोठा वाटा आहे.

**नेतृत्वाच्या कार्याचे दोन भाग पडतात.**

**१. राष्ट्राचा नेता २. शासकीय नेता** – राष्ट्रासमोर एखादी समस्या निर्माण झाल्यास नेता लोकांना आवाहन करतो. अशा प्रसंगी राष्ट्राच्या इच्छेचे प्रतिक म्हणून नेता कार्य करतो तर शांततेच्या काळात नेता शासकीय स्वरूपाची कार्य करतो. आज राजकीय अंतरंगात ही परिस्थिती बदलेली आहे. कारण राज्याची शक्ती संविधान आणि कायद्यानुसार संघटित झालेली आहे. प्रत्येक पदाच्या सत्तेचे क्षेत्र व मर्यादा निर्धारित केलेल्या असतात. नेतृत्वातील बदल नियमानुसार होतात.बळाच्या जोरावर सत्ता हस्तगत केली जात नाही. नेमणुका आणि निवडणुका हे सत्ता बदलाचे दोन मार्ग सर्वमान्य झालेले आहेत. व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप या गुणावर आधारित नेतृत्वाची संकल्पना आज मागे पडत आहे. कार्य पार पाडण्याची क्षमता हे आधुनिक राजकीय नेतृत्वाचे प्रमुख लक्षण मानले जाते. राजकीय नेतृत्व परिस्थितीजन्य असते. नेत्याची निवड अनेकदा परिस्थितीच्या आधारावर केली जाते. उदा. दुसऱ्या महायुद्ध काळात इंग्लंडच्या जनतेने चेंबरलेनचे नेतृत्व अमान्य करून चर्चिलला नेता निवडले. संकटकाळात जनता कणखर नेत्यांच्या हाती सत्ता सूत्रे देत असते. नेतृत्वाचा अभ्यास दोन दृष्टीने केला जात असतो. लहानलहान गटाच्या आधारावर नेतृत्वाचा अभ्यास करणे ही एक पद्धत तर मोठ्या स्तरावर म्हणजे राष्ट्राच्या स्तरावर नेतृत्वाचा अभ्यास करणे ही दुसरी पद्धत होय. या

दोन्ही पद्धतीचा वापर करून आधुनिक काळात राजकीय नेतृत्वाचा अभ्यास केला जात असतो. शासकिय वा राजकीय नेतृत्वाची वैशिष्ट्ये- शासकीय नेतृत्वाची खालील वैशिष्ट्ये सांगता येतात.

**१) जनता आणि नेतृत्व संबंध** - सर्वसाधारण जनतेपासून दूर अंतरावर राहतो. त्याचा लोकांशी प्रत्यक्ष संबंध फारसा येत नाही. रेडिओ, वर्तमानपत्रे, दूर अंतरावर असलेले नेतृत्व संस्थात्मक शासकिय वा राजकीय नेतृत्वाची वैशिष्ट्ये अनेक कार्यभाग पार पाडणारे नेतृत्व प्रस्थापित करतो. नेता विधिनिहित नेतृत्व दूरदर्शन अशा सामुदायिक स्वरूपाच्या राजकीय संसूचन माध्यमाद्वारे नेता जनतेशी संबंध आणि अनुयायी संबंध मध्यस्थ नेताद्वारे साधले जात असतात. आधुनिक समाजाची वाढती लोकसंख्या आणि भौगालिक विस्ताराचा विचार करता नेता व जनता संबंध दूर अंतराच्या स्वरूपात असतो. ते अंतर कमी करण्यासाठी राजकीस संसूचन माध्यमाच्या माध्यमातून म्हणजे मुलाखती, आवाहन, सभा, संमेलने इत्यादी माध्यमातून नेता जनतेशी संवाद साधण्याचा प्रयत्न करतो.

**२) विविध जबाबदेही नेतृत्व** - आधुनिक नेतृत्वाला अनेक भूमिका पार पाडाव्या लागतात. राजकीय नेत्याला राजकीय पक्ष, शासकीय कर्मचारी व सर्व साधारण जनता इ कार्य करावे लागते कारण तो एकाच वेळेस राजकीय पक्ष नेता, शासकीय यंत्रणेचा प्रमुख आणि राष्ट्राचा नेता असतो. नेत्याला या सर्व भूमिकेतून कार्य करावे लागते. त्या सर्व भूमिकेत त्याला योग्य समन्वय प्रस्थापित करावा लागतो. अर्थात हे सर्व नेत्याच्या अंगी असलेल्या कौशल्य आणि बुद्धिमत्तेवर सर्वस्वी अवलंबून असते.

**३) कायदेशीर नेतृत्व** - नेत्याला विशिष्ट यंत्रणेद्वारा आपले कार्य करावे लागते. त्याला मदत व सल्ला देण्यासाठी कर्मचारी वर्ग असतो. भाषणे लिहून दिली जातात, प्रतिनिवेदने तयार केली जातात, राजकीय नेत्यांचे दौरे आखणे, भेटीची वेळ निश्चित करणे इत्यादी सर्व कार्य नेतृत्वाला करणे शक्य नसल्याने या कामासाठी सचिवालय ही यंत्रणा निर्माण केलेली असते.

**४) संस्थात्मक व्यवहार** - राजकीय नेत्याला नियम व प्रस्थापित प्रथा ह्या नुसार व्यवहार करावा लागतो. अर्थात हे नियम लवचिक स्वरूपाचे असतात. पद धारण करणाऱ्या नेत्याला त्या पदाची परंपरा लक्षात घ्यावी लागते. यालाच नेतृत्वाचा वारसा असे म्हणतात. काळाच्या ओघात प्रत्येक पदाच्या विशिष्ट अशा परंपरा विकसित झालेल्या असतात त्या परंपराचा आदर करणे नेतृत्वाचे काम असते.

**राजकीय नेतृत्वाचे आधारभूत घटक**

राजकीय नेतृत्वाशी संबंधित अनेक बाबतीत विविधता असली तरी पुढाकार घेणारा आणि कार्यकर्ता यांचे संबंध मौलिक स्वरूपाचे दिसून येतात. राजकीय नेतृत्त्वाचे प्रमुख घटकाच्या परस्पर क्रिया प्रतिक्रियामधून नेतृत्वाची व्यापक प्रक्रिया साकार होते. नेतृत्वासाठी नेतृत्वाची जबाबदारी घेणारा, नेतृत्व स्वीकारणारा, नेतृत्वाला चालना देणारी परिस्थिती आणि नेतृत्वाचे कार्य इ. चार घटक आवश्यक असतात. नेता, अनुयायी, गटाचे उद्दिष्ट आणि ते साध्य करण्याचे मार्ग यानुसार नेतृत्वाचे स्वरूप बदलत असते. नेतृत्वासाठी लागणारे गुण व वैशिष्ट्ये परिस्थितीनुसार बदलत असतात. नेत्यांच्या ठिकाणी आज्ञा करण्याची आणि कार्यकर्त्यांकडून

त्या सत्तेला आज्ञापालनाच्या स्वरूपात प्रतिसाद मिळत असतो नेतृत्वासाठी खालील आधारभूत घटक आवश्यक असतात.

**१. कारभारी /नेता /पुढारी** – नेतृत्व हे 'समूहाला निर्देश देणारा आज्ञांकित करणारा, मार्गदर्शन करणारा अशी केली आहे. नेतृत्वाच्या अध्ययनावरील परंपरागत साहित्य हे बहुधा नेत्यावरील साहित्य आहे जसे गांधीजीचे नेतृत्व, अब्राहम लिंकनचे नेतृत्व इ नेतृत्व संकल्पनेत नेत्याचे स्थान निर्विवाद महत्त्वाचे आहे तसेच नेता म्हटले की नेत्याचे कार्य करणारा हे देखील स्पष्ट आहे. नेता म्हणजे समुहास त्याच्या उद्दिष्टाप्रत व उत्कर्षाप्रत नेणारी, त्यासाठी मार्गदर्शन करणारी, मार्गातील अडचणीचे निराकरण करू शकणारी व समूहाकडून योग्य ते कार्य करवून घेऊ शकणारी श्रेष्ठ दर्जाची व्यक्ती होय' नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वात काही विशेष गुण असतात. त्यात पुढाकार घेण्याची वृत्ती, विश्वास संपादन करण्याची कला, मार्गदर्शन करण्याची बुद्धिमत्ता, पेचप्रसंग सोडविण्यासाठी लागणारे धैर्य, नेत्याचा जन्म, शिक्षण, अनुभव, वक्तृत्व इ. गुण आवश्यक असतात. – Plea for the Study of Political Leadership मध्ये चार्लस मेरियम नेत्याच्या वर्तनाच्या अभ्यासावर अधिक भर देण्यासाठी वुड्रो विल्सन, अब्राहम लिंकन, विल्यम जेनिग्ज व थिओडोर रुझवेल्ट ह्या चार अमेरिकन अध्यक्षाच्या गुणाचा तुलनात्मक अभ्यास करून त्याच्या शारीरिक तथा मानसिक व्यक्तिमत्वाचे महत्त्व यावर भाष्य केले आहे. त्यासाठी पुढाऱ्याच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण कोणत्या परिस्थितीत झाली, तिच्या अध्ययनावरही भर दिला आहे

**२. अनुयायी/ समर्थक/ कार्यकर्ता –** कार्यकर्त्यांच्या परिभाषेबद्दल सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जे 'सक्रीय भूमिका वठविणारे असतात. नेतृत्वाच्या संबंधात कार्यकर्त्यांनासुध्दा महत्त्वाचे स्थान असते. नेता नेतृत्व करतो म्हणजे आपल्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन ध्येयप्राप्तीचा प्रयत्न करतो. त्यासाठी नेत्यांला दोन गोष्टी कराव्या लागतात. कामाच्या स्वरूपानुसार कार्यकर्त्यांचे वर्तन घडण्यासाठी त्यांना मार्गदर्शन करणे व प्रेरणा देणे आणि कार्यकर्त्यांच्या भावना व काम करतांना जाणवणाऱ्या समस्या समजावून देणे ही कार्ये नेता पार पाडत असतो. नेता व कार्यकर्ते यांचा कार्यभाग परस्परपूरक आहे. नेत्याला सर्व प्रकारचे सहाय्य करणे हे कार्यकर्त्यांचे काम असते. यात कार्यात सल्ला देणे, माहिती देणे, मतप्रदर्शन करणे इ. गोष्टीचा समावेश होतो. कार्यकर्त्यांची संख्या, निष्ठा, नेतृत्वाची स्वीकृती इ. घटकावर नेतृत्वाचा विकास व प्रभाव आणि कार्यकर्त्यांचे समर्थन अवलंबून असते. कार्यकर्त्यांच्याकडून मिळणारे समर्थन वा प्रतिसाद हा नेत्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा वा उत्साह वाढविणारा असतो त्याच बरोबर महत्वाचे म्हणजे एखाद्या व्यक्तीला गटाने शक्ती दिली की, तिचे पुढाऱ्यात रूपांतर होते. आपल्या शक्तीचा उपयोग इतर गटांवर करून आणि अशा अनेक गटांमध्ये समन्वय प्रस्थापित करून नेतृत्वाचा विस्तार केला जातो व त्याबरोबरच अनुयायी वर्गाचा देखील विस्तार होतो.

**३. विशिष्ट परिस्थिती/परिस्थिती** – राजकीय नेतृत्व घडण्यासाठी सभोवतालचे पर्यावरण जबाबदार असते. व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आणि सभोवतालचे भौतिक आणि सामाजिक पर्यावरण यांच्यात सतत आंतरक्रिया सुरू असते, व्यक्तीच्या नेतृत्व गुणांना प्रेरणा देण्याचे कार्यही पर्यावरण करत असते. थॉमस व

झानिकी (१९१८-१९४७) च्या मते प्रत्येक आकारबद्ध कृती ही कोणत्या ना कोणत्या परिस्थितीवरील उपाय होय. समुहातील व्यक्तींच्या परस्पर संबंधामुळे विशिष्ट परिस्थिती निर्माण होते, समुहाचे सर्वसाधारण स्वरूप, व्यापक अशा संस्कृतीचे स्वरूप की ज्यामध्ये गटाचे अस्तित्व असते, व ज्यामधून गटाचे सदस्य येतात. ज्या पर्यावरणात समुह काम करतो ती भौतिक परिस्थिती, समुहातील सदस्यांची समुहाच्या मूल्यासंबंधीची धारणा. ह्या सर्व घटकांचा परस्परावर परिणाम होऊन परिस्थिती बदलत असते. नवीन सदस्य समुहात आल्यामुळे देखील परिस्थितीत बदल होतो. विशिष्ट गुणविशेष व व्यक्तिमत्वामुळेच एखादी व्यक्ती पुढारी बनत नाही तर विशिष्ट परिस्थितीला व गटाच्या घटकांच्या त्या गुणवैशिष्ट्य व मूल्याबद्दल असलेल्या मूल्यमापनाच्या संदर्भात नेतेपण व अनुयायीपण अवलंबून असते.

**४. कार्यप्रणाली –** राजकीय नेतृत्व कार्यप्रणालीच्या आधारे नेतृत्व निश्चित केले जाते. नेतृत्व करण्यासाठी अनेक प्रकारची क्षेत्रे असतात. त्यापैकी कोणत्या क्षेत्रात कोणत्या प्रकारचे कार्य करणे आवश्यक आहे. ते किती प्रमाणात यश अपयश किती मिळाले यावर नेतृत्व अवलंबून असते. कारण कोणत्या प्रकाराचे कार्य आहे व त्याकरिता कोणत्या प्रकारचे नेतृत्व आवश्यक आहे हे ठरविणे आवश्यक असते. व्यक्तीगत नेतृत्वापेक्षा कार्यभाग पार पाडणाऱ्या नेतृत्वाला आज जास्त महत्त्व आहे. नेतृत्व क्रियाशीलतेतून व्यक्त होते यांचा अर्थ नेतृत्व ही गतिशील संकल्पना आहे. वरील चार घटकांच्या आधारावर नेतृत्व संकल्पनेची उभारणी होत असते.

**५. ध्येय–** नेतृत्वामध्ये ध्येयाला विशेष महत्त्व आहे.उद्दिष्टासंबंधी अथवा ध्येयासंबंधी हेम्फीलचे असे निरीक्षण आहे की, गटांचे विशिष्ट ध्येयामधील फरक हा भिन्न अपेक्षा व मागण्यांमुळे असून, त्यातून नेतृत्व प्रक्रिया चालते. कोणताही मानव गट हा ध्येयहीन नसतो. किंबहुना, उद्दिष्टांमुळे एक गट दुसऱ्या गटापासून भिन्न असतो. ध्येयाची पूर्ती व त्यासाठी उपयोगात आणावयाचे साधन तंत्र ह्यामुळे नेतृत्व प्रक्रिया गतिमान होते. जसे भारताचे स्वातंत्र्य मिळविणे हे सर्व नेत्यांचे उद्दिष्ट होते. परंतु अहिंसेच्या मार्गावर गांधीजींचा विश्वास होता तर सभाषचंद्र बोस ह्यांचा अहिंसेवर विश्वास नसल्यामुळे त्यांनी कॉंग्रेसचा त्याग करून आजाद हिंद सैन्याची स्थापना केली. लक्ष्यपूर्तीमध्ये होणारा विलंब ह्या आधारावर देखील गटात मतभेद होऊन नवीन पुढारी पुढे येतात.

**६. संज्ञापण / संसूचन साधने –** राजकीय नेतृत्वाच्या स्थानिक, प्रादेशिक तथा राष्ट्रीय अशा भिन्न भूमिका आहेत स्थानिक पातळीवर नेता व अनुयायी ह्यांच्यामध्ये परस्पर व्यक्तिगत संपर्क असू शकतो. परंतु प्रादेशिक राष्ट्रीय पातळीवरील नेत्यांना संसूचनाच्या माध्यमातून अनुयायींशी संपर्क साधावा लागतो.अनेकांच्या समूहात एखादी गोष्ट प्रसारित करणे अथवा पसरविणे ह्याला संसूचन म्हटले हे संकेत, चिन्ह अथवा प्रतिमांच्याद्वारे प्रसारित केले जाते. इथेल डी सोला पूलच्या मते, 'शासकीय बाबीसंबंधीच्या माहिती, संकल्पना व कार्ये प्रसारित करणाऱ्या काही विशेष संस्थांच्या क्रियांना 'राजकीय संसूचन' असे म्हटले जाते.' इंग्लंड-अमेरिकेसारख्या देशात ह्या प्रसारमाध्यमांच्या स्वायत्त संस्था असतात. साम्यवादी तथा आशियायी

देशांमध्ये ही माध्यमे सरकार नियंत्रित असतात. भारतात देखील ही माध्यमे शासकीय PTI / तसेच (संविधानिक) स्वायत्त संस्था स्वरूपाची आहेत.

**संसूचनातील क्रांती नेतृत्व व्यापकता**

राजकीय नेतृत्व प्रक्रियेवर सामाजिक, आर्थिक व राजकीय परिणाम म्हणजे संसूचन साधनांचा जागतिक पातळीवर वाढणारा प्रभाव होय. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात दूरचित्रवाणीमुळे एखाद्या व्यक्ती अथवा घटनेला अगदी नैसर्गिक रंगात लाखो-करोडो लोक ऐकवू, पाहू शकतात पुढे आजच्या परिस्थिती मध्ये फेसबुक व्हाटसअप, टविटर इंस्टग्राम. ई डिजिटल मार्केटिंगच्या माध्यमातून व्यापक स्वरूप मुळे नेतृत्व प्रक्रियेवर दूरगामी तथा सखोल परिणाम झाला आहे. त्यामुळे समाजात विशिष्ट धोरणावर सहमती निर्माण होऊन समाज एकात्म बनतो, अल्पमताच्या विरोधात बहुमताला स्थिरता प्राप्त होते, नेतृत्वाचे निर्णय सर्वसाधारण लोकांमध्ये लोकप्रिय करण्याचा प्रयत्न होतो, अनेक नवीन नवीन राजकीय समीकरणे समाजात रूढ करता येतात, भावनेला आवाहन केल्यास जनसामान्याना प्रभावित करता येते म्हणून जनप्रसार माध्यमाद्वारे (भारत मिडियाद्वारे) निर्णय प्रक्रियेवर म्हणजेच नेतृत्त्वावर प्रभाव पडतो. शासन, धर्मसंस्था, प्रेस, व्यापार, शिक्षणसंस्था, उद्योग ह्या सर्वांवर व्यापक प्रभाव पडतो.

## १.४.२ नेतृत्वाचा सामाजिक अंतरंगातून उदय :

नेतृत्वाचे व कार्यकर्ते यांचे उगमस्थान समाज भाग हा केंद्रस्थानी आहेत. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाची उगमस्थाने अर्थात् स्रोत देखील समाजाच्या भित्र संस्थांमध्ये आढळतात. प्राथमिक पातळीवर कुटुंब हे असून लहान मूल अगदी आईच्या कडेवर असते तेव्हापासून त्याची मानसिक जडणघडण सुरू होते, काही शास्त्रज्ञांच्या मते तर गर्भावस्थेपासूनच सुरू होते. लहान वयातच आईबाप मुलांचे कौतुक करीत असतात, त्यामुळे त्यांना प्रोत्साहन मिळते. सभोवतालच्या त्याच्यापेक्षा थोड्या अधिक मोठ्या मुलांचे ते अनुकरण करू लागते. बाल मानसशास्त्रज्ञांच्या मते, ५, ६ वर्षाच्या मुलाला वडिलांचे अधिक आकर्षण वाटू लागते. लॉरेन्स कोलबर्गच्या मते, कुटुंबात पित्याचा असणारा दरारा व मुलाला प्राप्त होणारे प्रेमळ छत्र ह्यामुळे त्याच्या दृष्टिने वडील ही सर्वात प्रभावी व्यक्ती असते, व नकळत मुलगा वडिलांचे अनुकरण करू लागतो. आपल्यापेक्षा धाकट्या भावंडांशी मुलगा आपल्या वडिलांप्रमाणे वागू लागतो. म्हणजे वडिलांच्या वागण्याची जणू तो नक्कल करीत असतो. धाकट्यांवर कधी रागावणे व त्यांना शिक्षा करणे तर कधी त्यांना प्रोत्साहन देणे इ. काही प्रमाणात का होईना, पण हेच त्याच्या नेतृत्वाचे उगमस्थान होय.

**१. नेतृत्वाची प्राथमिक अवस्था कुटुंब : सामाजिक जीवनाची जीवनवाहिनी :**

नेतृत्वाचा सामाजिक अंतरंगातून निर्माणाच्या अवस्थेला प्राथमिक मानले आहे. बालमन हे मातीच्या कच्च्या मडक्यासारखे अतिशय संस्कारक्षम असते कारण वास्तूशास्त्रामध्ये मातीचे मडकें हे नवनिर्माणचे प्रतिक असून याला उत्पत्तीचे प्रतिक ही मानले आहे. शिवाय सहा वर्षापर्यंत मुलांवर होणारे संस्कार दीर्घकालीन असतात. ह्या काळात भावनिक दृष्ट्या मूल दुर्बल असल्यास, भविष्यकाळातील राजकीय निर्णय

घेण्यास दुर्बल ठरतात. श्वाझरच्या मते, ५० प्रतिशत शारीरिक दुर्बल मुलांमध्ये, सामाजिक व राजकीय जाणीवा आढळल्या नाहीत उलट सशक्त मुलांमध्ये सामाजिक व राजकीय जाणीवांचे प्रमाण जास्त होते. राजकीय नेतृत्वाचा रॉबर्ट लेनच्या मते, 'राजकीय निष्ठा व सामाजिक श्रद्धा ह्यांचा पाया कुटुंबातून तीन प्रकारे घातला जातो. नकळतपणे शिक्षणातून घरात आई वडील, मोठी भावंडे ह्याची राजकीय घडामोडीवर जी चर्चा चालते, त्याचा मुलावर प्रभाव पडतो. फिलिप कॅन्हवर्स, जॉर्जेस ड्युपेक ह्यांचेही असेच मत आहे की, वडिलांचा प्रभाव मुलावर असतो. राजकीय मताशी, मुलाची मते सुसंगत असतात दुसरे म्हणजे व्यक्तिमत्वाला वळण लावणे सुशिक्षित कुटुंबात मुलांना प्रयत्नपूर्वक वळण लावतात. ह्यामध्ये व्यायाम, अभ्यास, शिष्टाचार ह्यासंबंधीच्या सवयी लावल्या जातात. पाठांतर, संभाषण कला ह्यावर भर दिला जातो. तिसरे म्हणजे, विशिष्ट सामाजिक संदर्भाचा प्रभाव कुटुंब कोणत्या जाती, वर्ग, अथवा वर्णाचे आहे, त्यासंबंधीचा प्रभावदेखील ह्या काळात दृढमूल होतो.' अशाप्रकारे, कुटुंबातून मिळणाऱ्या संस्काराद्वारे समाजाकडे पाहण्याचा बालकाचा एक विशिष्ट दृष्टिकोण तयार होतो. नवीन नवीन प्रयोगातून बुद्धीचातुर्य, भाषा व तर्कबुद्धीचा विकास होतो. ह्याचा परिणाम म्हणजे एका निष्क्रिय अनुयायाच्या अवस्थेतून प्रसुप्त नेत्यामध्ये (पोटेंशियल लीडर) त्याचे रूपांतर होऊ लागते. हळूहळू सभोवतालच्या परिस्थिती तथा आवश्यकतानुसार त्याचे उद्दिष्ट व कार्यपद्धती तो स्वतः निश्चित करू लागतो. मुलाच्या वाढत्या वयाबरोबर त्याच्यामध्ये सामाजिक तथा राजकीय जाणीवा निर्माण होऊ लागतात. मुलगा कुटुंबाचा घटक असतो, त्याचप्रमाणे विशिष्ट जात, वंश, घराणे, वर्ग, भाषागट, संप्रदाय, व्यावसायिक गट तथा प्रादेशिक समुदायाचाही घटक असतो. वाढत्या वयाबरोबर वरील समूहांच्या संबंधाची त्याला जाण येऊ लागते. ऐतिहासिक घटनांच्या संदर्भात, वर्तमान काळातील चालू घटनांचे विश्लेषण करीत, भविष्यकाळाचा वेध घेण्याचे कार्य त्याच्या अंतर्मनात चालू असते. जसे छत्रपती शिवाजी महाराजांना जिजामाता यांच्या मार्गदर्शनाने रामायण-महाभारतातील कथांमुळे अल्पवयातच त्यांची 'अस्मिता' जागृत झाली व शहाजी महाराजांच्या नेतृत्वाचा प्रभावामुळे राजकीय व्यवहाराची दृष्टी प्राप्त झाली. राजकीय सामाजीकरणाच्या प्रक्रियेत कुटुंबाची भूमिका अधिक प्रभावी आहे हे निःसंदिग्ध होय. सारांश, 'कुटुंब ही सामाजिक जीवनाची पाठशाला होय' हे ॲरिस्टॉटलचे विधान आजही प्रमाणभूत मानले जाते.

**२. शाळा-महाविद्यालये राजकीय सामाजिकरणाची बलस्थाने :**

नेतृत्वाची उगमस्थाने अर्थात् हजारों वर्षापासून शिक्षणसंस्था आहेत. राजकीय सामाजीकरण हे नेतृत्व निर्मितीचे प्रभावी साधन मानले जातात. शाळा-कॉलेज मध्ये शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाचा मुलांच्या जडणघडणीवर विशेष प्रभाव पडतो. शिक्षणाचे हे महत्त्व लक्षात घेऊन लो. टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणावर व ते देण्यासाठी राष्ट्रीय शाळांवर भर दिला होता. भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनात ह्या राष्ट्रीय शाळांमधून तयार झालेल्या तरुण पिढीने अत्यंत महत्त्वाची नेतृत्वाची भूमिका सादर केली आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या विचाराने भारावलेले व्यापक नेतृत्व भारतात उभे झाले. त्यांच्यामध्ये देशभक्ती समाजसेवा, सामाजिक बांधिलकी अशी जीवनमूल्ये निर्माण झाली. काही वर्षांपूर्वी आठ पाश्चात्य देशांच्या केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारावर प्रा. चार्लस् मेरियमने 'शाळा म्हणजे नागरी शिक्षणाचे प्रभावी साधन' असे म्हटले आहे. भारतातसुद्धा शालेय विद्यार्थ्यांना राष्ट्रीय पुढारी, राष्ट्रगीत ह्यांच्याबद्दल ज्ञान असते. काल आज ही राजकीय पक्षांच्या ध्येय

धोरणापेक्षा त्यांच्या पुढाऱ्यांच्या नावाने विद्यार्थी पक्षांना ओळखत असल्याचे आढळून येते. ती परिस्थिती परंतु १९८९ च्या नोव्हेंबरच्या लोकसभा निवडणुकीची असो किंवा आताच्या २०२४ च्या लोकसभा निवडणुकीची यामध्ये पक्षाच्या नेतृत्वापेक्षा राजकीय पक्षाच्या कार्यक्रमाबद्दल विशेष आकर्षण होते. आरक्षण, भ्रष्टाचार, बेकारी, महागाई ह्या मुद्यावर तरुण विद्यार्थ्यांनी काल कॉंग्रेसच्या आज भाजपच्या विरोधात मोठ्या प्रमाणावर मतदान केल्याचे विश्लेषणातून दिसून येते. सार्वजनिक जीवनासाठी अत्यंत आवश्यक अशा स्वयं अनुशासन, सांघिक कृती (टीम वर्क), गटनिष्ठा, रूढी व कार्यक्षमता ह्यातील समतोल, श्रेष्ठत्व, संयमित व उदात्त वागणूक, हुकूम देण्याची क्षमता, आत्मसम्मानाची भावना तथा आत्मविश्वास इ. नेतृत्वगुणांची निर्मिती ह्या शिक्षणामधून मिळते.

ग्रामीण भागातील शिक्षणाने नेतृत्वाची विकासाबाबत डॉ. केदारनाथ कुमार ह्यानी 'एज्युकेशन अँड पोलिटिकल डेव्हलपमेंट इन व्हिलेज इंडिया' ह्या संशोधन निबंधात म्हटले की, ग्रामीण भागातील शिक्षणाने फार मोठा बदल घडवून आणला आहे. शिक्षणाचे महत्त्व ग्रामीण लोकांना कळल्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या प्रचंड वाढत आहे. इतर जातीपेक्षाही मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये अन् विशेषतः हरिजन, आदिवासी ह्यांच्या शिक्षणाने राजकीय जागृती निर्माण केली आहे. त्यांना स्वत्वाची जाणीव होऊन हा वर्ग अधिक संघटित बनला आहे. ग्रामीण राजकारणात ह्या विद्यार्थ्यांचा सहभाग वाढला आहे. ह्यामुळे ग्रामीण राजकारणाचा देखील चेहरामोहरा बदलला आहे. नवी मूल्ये, आत्मविश्वास, नवे नेतृत्व, सामाजिक-आर्थिक तथा राजकीय जाणिवा ह्या शिक्षणामुळे वाढल्या आहेत. विद्यार्थिनींचीही संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून त्यामुळे शिक्षणाचा प्रभाव व्यक्तिशः त्यांच्या बौद्धिक विकासाच्या दृष्टिने अनुकूल झाला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात विद्यापीठांच्या व महाविद्यालयांच्या वाढत्या संख्येबरोबर, विद्यार्थ्यांचीही संख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे, आणि १९५६ च्या भाषावार प्रांतरचनेबरोबरच विभिन्न जाती समूहात हा समाज विभागला गेला असून विद्यार्थ्यांच्या जातीनिहाय संघटना महाविद्यालयाच्या राजकारणाबरोबर गावांच्या राजकारणात सक्रिय झाल्या आहेत

### ३. नेतृत्वामध्ये श्रेष्ठत्वाची भावना :

राजकीय नेतृत्वामध्ये स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ मानण्याची तीव्र इच्छा असते. नेतृत्वाच्या उगमस्थानाचा शोध घेतांना, कांही गुण असे आहेत की, ते बालकाच्या वाढत्या वयाबरोबर त्यांना अव्यक्त नेतृत्वाच्या स्थितीपर्यंत पोहचवितात व त्यामुळे स्वतःला इतरापेक्षा श्रेष्ठ मानण्याची तीव्र इच्छा असते. त्या भावनेतून सामाजिक जबाबदारीची जाण त्यांच्यामध्ये निर्माण होते. सामाजिक वर्ग अथवा जाती पातळीवर विचार केल्यास, असे दिसून आले आहे की समाजाच्या वरिष्ठ वर्गातून व जातीमधून पुढारी वर्गाची भरती मोठ्या प्रमाणात होते. उदा गावातील पाटील, देशमुख, जमीनदार, उच्च जातीमधील प्रतिष्ठित नागरिक ह्याची मूलं पुढारी असतात. समाजाचे पुढारीपण स्वाभाविकपणे त्याच्याकडे येते कारण श्रेष्ठत्वाची भावना त्यांच्यामध्ये असते मात्र सर्वच राजकीय पुढारी सामाजिक दृष्ट्या प्रतिष्ठित वर्गातून येतात असे नाही सामान्यतः मुलामध्ये श्रेष्ठत्वाची अथवा आत्मसन्मानाची भावना निर्माण होण्यासाठी घराण्याची सामाजिक प्रतिष्ठा, श्रीमंती, त्याचबरोबर शिक्षण, विशेष बुद्धिमत्ता, शारीरिक खेळ अथवा कलेतील नैपुण्य, अभिनयकुशलता हे घटक

महत्त्वपूर्ण आहेत विशेष बुद्धिमत्ता म्हणजे बुद्धीची गुणवत्ता (मेरिट) हा एक प्रकार झाला न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे त्याच्या उच्च शिक्षणामुळे लोकांच्या आदरास पात्र होते.

## ४. महत्त्वाकांक्षा :

राजकीय नेतृत्वामध्ये महत्त्वाकांक्षा हा गुण असतो  कोणत्याही व्यक्तीमध्ये जर महत्त्वाकांक्षा असेल तर त्यामधून राजकीय महत्वाकांक्षा निर्माण होण्याची शक्यता असते निरनिराळ्या राजकीय पुढाऱ्यांची चरित्र तपासून बघितली तर त्यांच्या पूर्वआयुष्यत महत्त्वाकांक्षेचे बीज रुजलेले आढळून येते. गांधीजी कायद्याचा अभ्यास करण्यासाठी लंडनना पोहोचले तेव्हा इंग्लंडला येण्याचे कारण त्यांना विचारले, त्यावर 'महत्त्वाकांक्षेमुळे असे त्यांचे उत्तर होते. भारतात परत आल्यावर वकिलीतही जम बसवू शकले नाहीत पण म्हणून त्यांची महत्त्वाकांक्षा कमी झाली नाही. वकिलीच्या निमित्ताने त्यांना द. आफ्रिकेत जाण्याची 'संधी' मिळाली तेथे वर्णद्वेषामुळे त्यांना गोऱ्याच्या अत्याचाराना तोंड द्यावे लागले तेथील इतर भारतीयाप्रमाणे अन्याय चुपचाप सहन न करता, त्यांचा प्रतिरोध करण्याचे मानसिक बळ त्यांच्यात निर्माण झाले. भगवद्‌गीता, थोरो, रस्किन, टॉलस्टॉय ह्यांच्या वाचनाने परिस्थितीला तोंड देण्यासाठी त्यांनी एक धोरण तयार केले. हाच त्यांच्या 'राजकीय नेतृत्वाचा प्रारंभ होय, राजकीय लढ्यासाठी त्यांनी सत्याग्रहाचे तंत्र वापर केला. त्यांचा आत्मविश्वास वाढतच गेला व गांधीजी एक जनतेचे नेते म्हणून अजरामर झाले.

## ५. राष्ट्रभक्ती :

मायभूमीविषयी आत्मीयता, देशप्रेम 'राष्ट्रभक्तीची भावना' नेतृत्वाचे उद्याच्या प्रमुख लक्षणांपैकी एक आहे. देश अथवा समाजाबद्दल आत्यंतिक प्रेम ह्या भावनेला ढोबळमानाने राष्ट्रभक्ती असे म्हणता येईल. जगाच्या कानाकोपऱ्यात अशा तीव्र भावनेने भारावलेल्या व्यक्ती बऱ्याच संख्येत असतात. ह्यावरून देशभक्तीच्या तीव्र भावनेमुळे इतरांच्या आचरणात अनुकूल बदल करण्याची आकांक्षा निर्माण होते, म्हणून 'राष्ट्रभक्तीची भावना' नेतृत्वाचे उगमस्थान होय. त्यामधून पुढारी व अनुयायी ह्याचा एक वर्ग निर्माण होतो. समाजासाठी काहीतरी करण्याची तीव्र आकांक्षा हा एक प्रकार होय गोऱ्यांच्या विरुद्ध संघर्ष करणारे नेल्सन मंडेला किंवा द.आफ्रिकेत भारतीयांसाठी संघर्ष करणारे गांधीजी ह्यांच्या भावना व आकांक्षा ह्यांचे स्वरूप वरीलप्रमाणेच होय.

## ६. जातीसमूहामधून आलेले नेतृत्व :

राजकीय नेतृत्व हे जातीच्या अंतर्गत चालणाऱ्या लहान मोठ्या कार्यक्रमातून अनेक व्यक्तींना सामाजिक कार्य करण्याची संधी मिळते कार्य करण्यातून पुढे नेतृत्वाची संधी मिळते. भारताच्या निरनिराळ्या प्रदेशात काही प्रमुख जाती प्रभावी असून, समाज जीवनात तसेच राजकारणात त्यांना महत्त्वाचे प्रभावी स्थान प्राप्त झाले आहे. जसे दक्षिणेत नाडर, नायर, अय्यर तर उ. प्रदेशात ठाकूर, जाठ, इ. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अनुसूचित जातीमधून निर्माण होणारे नेतृत्व, कर्पुरी ठाकूरांचे, अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. अशाचप्रकारे संप्रदायाच्या कार्यातूनसुद्धा नेतृत्वाची निर्मिती झाली.

### १.४.३ नेतृत्वाचे प्रकार :

**१. विवेकी नेतृत्व :**

राजकीय नेतृत्व हे विवेकी नेतृत्व केवळ आदर्शवादी व कल्पनावादी नसते तर सामाजिक वस्तूस्थिती व उच्च आदर्श ह्यांच्यामध्ये समन्वय साधणारे असते. हे नेतृत्व संक्रामक स्वरूपाचे असते. जे. पी. नेटलच्या मते विवेकतेचा संबंध केवळ विचारांशी नसून उत्तम समाज रचनेशी आहे. प्राचीन काळातील श्रीरामाचे नेतृत्व हे विवेकी नेतृत्वाचे उत्तम उदाहरण आहे. विवेकानंदानी आध्यात्म, हिंदुत्व, राष्ट्रीयत्व व विश्वबंधुत्व ह्याचे प्रभावी शब्दात केलेल्या भाष्याचा प्रभाव केवळ भारतावरच नव्हे तर अमेरिका, इंग्लंडसारख्या समृद्ध देशावर पडला होता योगी अरविंद, लो. टिळक, म. गांधी, ह्यानादेखील विवेकानंदाच्या आध्यात्मिक राष्ट्रवादाचा वारसा प्राप्त झाला होता भारतीय चिंतनाचा आधार आध्यात्मिक होते.

**२. सुधारणावादी नेतृत्व –**

रूढीप्रिय समाजातील कोणत्या प्रकारच्या रूढींचा विरोध केला तर लोकप्रियता प्राप्त होते हे समजण्यासाठी विशिष्ट प्रकारचे राजकीय कौशल्य नेत्यामध्ये आवश्यक असते. प्रस्थापित रूढी व उच्च उद्दिष्टे ह्याच्यात सामंजस्याद्वारे समन्वय निर्माण करण्याचे कार्य सुधारणावाद्यांना करावे लागते. ह्याउलट क्रांतीवादी नेत्यांचे आहे प्रस्थापित रूढी व परिस्थितीचे समूळ उच्चाटन करण्याची त्याची आकांक्षा असते. 'सुधारणावादी एखाद्या रूढीत बदल करण्यावर म्हणजे टप्प्याटप्प्याने त्यात सुधारणा करण्यावर भर देतात तर क्रांतीवादी त्याच्या समूळ उच्चाटनाचा एकदम प्रयत्न करतात दोन्ही प्रकारात उद्दिष्ट, तंत्र व मनोभूमिका ह्या आधारावर फरक आहे. सुधारणावादी नेते हळुवारपणे व क्रमशः समाजात् परिवर्तन घडवितात. एक महत्त्वाचा प्रश्न असा उपस्थित होतो की, सुधारणावादी नेत्याचे यश किवा अपयश कशावर अवलंबून आहे. भारतामधील सुधारणावादी नेतृत्वाचा इतिहास फार प्राचीन आहे. गौतम बुद्ध हे महान सुधारक होते बुद्धाने जातीभेद मिटविण्याचा प्रयत्न केला. तसे जगातील प्रत्येक समाजाचा अभ्यास केल्यास सुधारणावादी प्रवृत्ती त्यात अंगभूत स्वरूपात असते. फरक एवढाच की, कुठे कमी तर कुठे जास्त असते. भारतामधील आधुनिक काळातील सुधारणावादी पुढाऱ्यांचा विचार केला की, राजा राममोहन रॉय, म. ज्योतिबा फुले, गोपाळराव आगरकर, ना. गोखले ह्यांची नावे पुढे येतात अगोदर सामाजिक सुधारणा की, राजकीय स्वातंत्र्य हा आगरकर टिळक वाद प्रसिद्धच आहे. तसे लो. टिळकांचा सामाजिक सुधारणेला विरोध नव्हताच. तर त्यांच्या मते सामाजिक सुधारणा स्वतःपासून सुरू कराव्या, कायद्यापेक्षा समाज परिवर्तनावर भर असावा व देशाच्या स्वातंत्र्याला अग्रक्रम असावा हा होता.

**३. क्रांतीकारी नेतृत्व :**

क्रांती म्हणजे व्यापक अर्थांनी राजकीय तथा सामाजिक व्यवस्थेमधील बदल होय. हा बदल बऱ्याच वेळा एखाद्या विचार प्रणालीच्या आधारावर व राजकीय नेतृत्वाच्या द्वारे होतो. त्यामुळे प्रस्थापित शासन व्यवस्थेचे उच्चाटन होऊन नवीन राजकीय व्यवस्था अस्तित्वात येते. त्या अनुषंगाने अर्थव्यवस्था, शिक्षणप्रणाली, कायदा आणि नेतृत्वात बदल होतो. प्रत्येक देशात क्रांतीचे स्वरूप भिन्न असते. तसेच प्रत्येक

काळातही ते सारखे नसते. म्हणजेच देश काळपरत्वे ते भिन्न आढळून आले आहे. कुठे क्रांती अंशतः झालेली दिसून आली तर कुठे पूर्णतः भारतात नंदवंशाचे उच्चाटन होऊन सम्राट चंद्रगुप्त मौर्याची राजवट प्रस्थापित झाली ह्यात केवळ राजा बदलला नाही तर जुलमी व भ्रष्ट राज्यव्यवस्था बदलून एक प्रगत, कल्याणकारी व विस्तृत अशी व्यवस्था अस्तित्वात आली. असे कौटिल्याच्या अर्थशास्त्रावरून दिसून येते. बहुतेक राज्यक्राती विशिष्ट राजकीय विचारप्रणालीच्या आधारावर झाल्या पण ह्याचा अर्थ असा नव्हे की, ते तत्त्वज्ञान क्रांती पूर्ण झाल्यावर पूर्णतः साकार होतेच. क्रांतीचे राजकीय नेतृत्वाच्या क्षमतेवर यश, अपयश तथा परिणाम झालेले दिसून येतात.

### ४. वलयांकित नेतृत्व :

वलयांकित नेतृत्व हे देश-विदेशात चमत्कृतीपूर्ण अथवा वलयांकित नेतृत्वाची गूढ, अनाकलनीय तथा संमोही स्वरूपाचे व्यक्तिमत्व व त्याला मानणाऱ्यांचा अनुयायी वर्ग ह्यातून चमत्कृतीपूर्ण नेतृत्व निर्माण होते. सामान्य मानवी बुद्धीला अनाकलनीय अशा चमत्कारी घटनांमुळे लोक अशा व्यक्तींना मानू लागतात. आजच्या रूढ अर्थाने राजकीय पुढारी नव्हते, पण त्याच्या अलौकिक व्यक्तिमत्वामुळे त्यांचे नेतृत्व चमत्कृतीपूर्ण मानले जाते. मॅक्स वेबरच्या मते नेतृत्वातील 'दैवी गुणसंपदामुळे हे चमत्कृतीपूर्ण नेतृत्व निर्माण होते. दुर्दैवाने वेबरचे विवेचन गूढवादामुळे अस्पष्ट आहे. आधुनिक काळात चमत्कृतीपूर्ण नेतृत्वासंबंधी अत्यंत समाधानकारक असे मनोवैज्ञानिक तथा सामाजिक स्वरूपाचे सिद्धान्त विकसित झाले आहेत. त्यानुसार चमत्कृती म्हणजे विश्वास व ओळख ह्यांचे नेतृत्वासंबंधीचे विशिष्ट प्रकारचे संमिश्रण होय. एखाद्या मानव समूहाची ओळख, त्याने स्विकारलेली मूल्ये ह्यावर अवलंबून असते. 'अलौकिक' नेतृत्वासंबंधी छत्रपती शिवाजी महाराज गुणसंपदेमुळे 'स्वराज्य' हे उद्दिष्ट ठेवून त्याने मावळ्यांचा एक सशस्त्र समूह तयार केला. बाल-वयातच तोरणा किल्ला जिंकून, स्वराज्याचे तोरण बांधले. पुढे अफजलखान, शाईस्ताखान यांची अफाट फौजेसह त्यांची दाणादाण उडवून दिली. औरंगजेबाच्या कैदेतूनही तो सहीसलामत सुटून आले. ह्यामध्ये अनुयायींचा विश्वास, लढाईतील अचूक निर्णय, आत्मविश्वास, मुत्सद्दीपणा तसेच दिलदारपणा, सुसंस्कृतपणा ह्यामुळे विरोधी गटातसुद्धा त्याच्याबद्दल आदर होता.

### ५. जनमतावर आधारित नेतृत्त्व :

लोकशाही व्यवस्थेत जनमतावर आधारित नेतृत्त्व ह्या संकल्पनेच संबंध पुढारी व अनुयायी ह्यांच्यामधील मानसिक अवस्थेवर आहे एकतर जनमत नेतृत्त्वाची संकल्पना पाश्चात्य व आधुनिक आहे. उदारवादी स्वरूपाच्या लोकशाही देशामध्ये ह्या संकल्पनेचा प्रथम विकास झाला जनमत नेतृत्वाचा विचार करताना असे गृहीत धरले जाते की, समाजात निरनिराळे जनमत प्रवाह असतात. नेतृत्त्व त्या विशिष्ट 'मताच्या आधारावर लोकांना अपील करतो. लोक त्याचेभोवती जमा होतात. हळूहळू नेता व अनुयायी ह्याच्यामध्ये वैचारिक संबंध निर्माण होऊन त्याचा उपयोग निवडणुकीत 'मत मागण्यासाठी होतो. निर्वाचित नेतृत्त्व नंतर विधीमंडळात आपल्या अनुयायींच्या विचारांचे प्रतिनिधित्व करतो. सामान्यतः जनमत नेते जीवनावश्यक अशा गरजा किंवा मुद्दे डोळ्यासमोर ठेवतात. एखाद्या जनमत समूहाचे सदस्यत्व अधिक लोकांना समावून घेणारे

असूनही त्यांच्यामधील परस्पर संबंध दृढ स्वरूपाचे असतील व समूहाची वाढ गुणाकारात्मक स्वरूपाने होत असेल तर नेतृत्वाचा प्रभाव वाढत असतो. भारतात १९६९ साली राष्ट्रपतीच्या निवडणुकीच्या वादामध्ये इंदिरा गांधींच्या '१४ बँकाचे राष्ट्रीयकरण, २० कलमी कार्यक्रम' हे जनमताला आवाहन करण्याला कारणीभूत झाले. त्यामुळे १९७१ च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत इंदिरा काँग्रेसला विजय मिळाला.

### ६. **समूहाचे नेतृत्व :**

समूहवादी नेतृत्व व्यक्तींच्या विशिष्ट गुणांपेक्षा गटातील व्यक्ती-व्यक्तींच्या परस्पर संबंधामुळे निर्माण होणारी संरचना मानतात. व्यक्ती आपापले हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी व अधिक व्यापक बनविण्यासाठी कधी सामूहिक रितीने एकत्र येतात तर कधी विभक्त होतात. त्यांच्या अंतरसंबंधातून 'सामाजिक व्यवहार निर्माण होतात. समाज अनेक समूहांचा समुच्चय होय. हे समूह केवळ माणसांचे संख्येच्या आधारावर नसून विशिष्ट विचार, भावना, कल्पना ह्यांच्या आधारावर कृती अथवा कार्याशी जोडलेले असतात. ही कार्ये सतत व सदैव चालणारी सामूहिक प्रक्रिया असते. समूहाच्या संख्येपेक्षा 'कार्याचा' निर्णयप्रक्रियेवर प्रभाव अधिक पडतो. हे कार्य समूहाच्या उद्दिष्ट, नेतृत्व, प्रचारकौशल्य दबावतंत्र ह्यांच्या क्षमतेवर अवलंबून असते. उदाहरणार्थ, भारतामध्ये जाती हा एक हितसंबंधी गट आहे. तसे आर्थिक हितसंबंधावर मोठ्या उद्योगपतींचे, मजूर संघटनाचे गट आहेत. सरकारी कर्मचारी, बँक कर्मचारी, शिक्षक, आपआपल्या गट संघटना आहेत. भाषा, संस्कृती, संप्रदाय, वर्ग ह्या आधारावर सुद्धा गट- समूह आहेत

### ७. **पक्ष नेतृत्व :**

पक्ष नेतृत्व हे राजकीय पक्ष छोट्या मोठ्या भिन्न गटातून कसे निर्माण होतात हे आपण ह्यापूर्वी बघितले आहे. ह्या गटांच्या मध्ये नेतृत्व कसे विकसित होते हेसुद्धा आपण बघितले आहे. छोट्या मोठ्या गट अथवा समूहांच्या पुढाऱ्याच्या घेवाण-देवाणीतून अधिक विस्तृत गट व त्यामधून राजकीय पक्ष निर्माण होतात. अमेरिकेच्या सुरूवातीच्या काळात अध्यक्षीय निवडणुकीसाठी आजच्याप्रमाणे विशाल पक्षव्यापी संघटना नव्हती. जॉर्ज वाशिंग्टन हा तर पक्षातीत होता. मात्र त्यांच्या मंत्रीमंडळातील अलेक्झांडर हॅमिल्टन व जेम्स मेडिसन ह्यांच्याभोवती नंतर पक्ष निर्माण झाले २० व्या शतकात राजकीय पक्षाचा उदय झाला. नागरिकांना मतांसाठी आवाहन करू लागले. भारतामधील पक्षनिर्मितीचा इतिहास बघितला तर असे दिसून येते की, काँग्रेसच्या निर्मितीचे अधिकांश श्रेय इंग्रजी शासनातील सेवानिवृत्त अधिकारी सर ॲलन ह्यूम ह्यांना द्यावे लागते. नंतर दादाभाई नौरोजी, फिरोजशाह मेहता, सुरेंद्रनाथ बॅनर्जी इ. पुढारी काँग्रेसमध्ये आले. आपल्या पुढारीपणासाठी. १९१७ च्या साम्यवादी क्रांतीमुळे प्रभावित होऊन कॉ. डांगे आणि मित्रांनी १९२३ च्या सुमारास साम्यवादी पक्षाची स्थापना केली व स्वतःचे नेतृत्व प्रस्थापित करण्यासाठी रामस्वामी नायकर ह्याने द्रवीड संस्कृतीच्या आधारावर पेरियर पक्षाची स्थापना केली (१९२५). त्यांतून १९४७ साली बाहेर पडून अण्णा दुराई ह्याने द्रवीड मुनेत्र कडघम पक्षाची स्थापना केली. चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या काळात काँग्रेसमधून बाहेर पडून चरणसिंगांनी आपल्या जाठ मंडळीच्या अस्मितेच्या आधारावर भारतीय क्रांती दलाची स्थापना केली. मार्च १९७७ च्या निवडणुकीत लोकदल ह्या नावाने त्यांचा गट जनता पक्षात आला.

अशाप्रकारे पुढाऱ्यांच्या घेवाण-देवाणीतून गटांचे विलीनीकरण तथा विलगीकरणाबरोबर पक्ष अस्तित्वात येतात. १९६० ते १९७२ ह्या काळातील 'राजकीय स्थैर्याचे' बरेचसे 'श्रेय' श्री. यशवंतराव चव्हाणांच्या कुशल नेतृत्वाला दिले जाते. त्यांनी सामावून घेण्याचे धोरण ठेवल्याने काँग्रेस बाहेरील विविध पुढाऱ्यांना काँग्रेसमध्ये समाविष्ट करता आले. तसेच १९६० नंतर सहकारी संस्था, पंचायत राज, शिक्षणसंस्था ह्यांचे जाळे विणून अनेक नव नेतृत्व निर्माण झाले. ह्यामुळे पक्षात सामंजस्य राहून पक्षातील ताण-तणाव कमी झालेत. कारण सत्तेमध्ये अनेकांना सहभागी करून घेण्याची किमया पुढाऱ्यांनी साधली.

**विधिमंडळीय नेतृत्व :**

आधुनिक काळात विधिमंडळ हे देशाच्या राजकारणाचे सत्ताकेंद्र बनले आहेत कारण आर्थिक, सामाजिक, राजकीय तथा धार्मिक बाबतीत कायदे करण्याची अंतिम सत्ता कायदेमंडळाला असते समाजात अनेक प्रकारच्या सुधारणा ह्या कायदेमंडळाद्वारे केल्या जातात त्यामुळे बहुतेक देशातील अधिकांश राजकीय नेतृत्व हे विधीमंडळीय नेतृत्व बनले आहे भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळात आणि विशेषतः भाषावार प्रांतरचना तथा लोकशाही विकेंद्रीकरणानंतर (पंचायती राज्य संस्थांच्या निर्मितीनंतर) लोकांचे मोठ्या प्रमाणात राजकीयकरण होऊन ते राज्यातील भिन्न सत्ताकेंद्रांशी जोडले जाऊ लागले. अशाप्रकारे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय तसेच शैक्षणिक क्षेत्रे राजकीय पुढाऱ्यांमुळे आणि विशेष करून विधीमंडळीय पुढाऱ्यांच्याद्वारे प्रभावित झाली आहेत. विधीमंडळीय पुढाऱ्यांच्याद्वारे ह्या भिन्न क्षेत्रांतील विकास व आधुनिकीकरणाची गती वाढण्यात राज्यसत्तेला अग्रेसर बनविले आहे.

**कार्यकारी नेतृत्व :**

'राजकीय नेतृत्वाच्या संकल्पनेत कार्यकारी नेतृत्व' हा एक प्रकार आहे. पक्ष नेतृत्वात पुढाऱ्यांना पक्षाच्या संघटनेमुळे शक्ती प्राप्त होते, तर कार्यकारी पुढाऱ्यांची शक्ती नोकरशाहीतून प्राप्त होते सांसदीय नेत्याला त्याची शक्ती विधीमंडळ सदस्यांकडून प्राप्त होते तर कार्यकारी नेत्याला नोकरशाही अंदाजपत्रावरील नियंत्रणाबरोबरच आपले बुद्धीकौशल्य, प्रतिष्ठा, लोकप्रियता ह्या व्यक्तिगत गुणांच्या आधारावर कार्यकारिणीला प्रभावित करावे लागते जनतेला आवाहन करून व कार्यक्षम कार्यकारिणी द्वारा प्रभावित करता येते.

## १.४.४ राजकीय नेतृत्वाची भूमिका व कार्ये :

राजकीय नेतृत्वाची भूमिका ही आधुनिक काळात लोकांच्या राजकीय सहभागाचे प्रमाण वाढत आहे लोकशाहीच्या विकासाबरोबरच, राजकीय सहभागाच्या विविध संधी आणि माध्यमे नागरिकांना उपलब्ध होत आहेत. त्याचबरोबर लोकशाहीचे स्वरूपही अधिकाधिक, प्रातिनिधिक बनू लागले आहे. विधिमंडळे, मंत्रीमंडळे, राजकीय पक्ष, दबावगट, हितसंबंधी गट, निवडणुका, आंतरराष्ट्रीय घडामोडी, वृत्तपत्र (प्रेस), जनमत, सार्वजनिक संसूचन माध्यमे इत्यादींच्या राज्यव्यवस्थेमधील वाढत्या विकासाबरोबर तसेच ह्या संरचनांशी व्यक्तींच्या असलेल्या घनिष्ठ संबंधामुळे त्यांच्या राजकीय सहभागाची व्याप्ती वाढत आहे.

### अ. नेतृत्वाचे प्रयोजन :

नेतृत्वाची भूमिका व कार्य ह्यासंबंधीचे जेम्स मॅकग्रागर बर्न्सचे विवेचन अतिशय अर्थपूर्ण आहे. त्याच्या मते, बहुधा पुढारी लोक पुढाऱ्याप्रमाणे वागत नाहीत. ते वागत नाहीत म्हणजे ते वागू शकत नाहीत. कारण, पुढाकार घेण्याचे कार्य काही विशिष्ट मूल्य अथवा हेतूसाठी केले जाते. ह्या मूल्य व उद्दिष्टांच्या आधारावर समाजाच्या आवश्यकता, मागण्या व आशाआकांक्षा ह्यांची संरचना निर्माण होते. अशा संरचनेचा पाठिंबा मिळविण्यासाठी साधारणतः नेते लोक पुढाकार घेतात. समाजात भिन्न स्वरूपातील जीवनमूल्ये, उद्दिष्टे तसेच हितसंबंधांच्या आधारावर कधीकधी परस्पर संघर्ष निर्माण होऊन समस्या निर्माण होतात. पुढारी वर्ग आपल्याला अधिकार, अधिक लोकांचा पाठिंबा मिळावा म्हणून समस्या सोडविण्यासाठी पर्याय सुचवितात. हे पर्याय नेत्यांच्या पसंतीचे असतात म्हणून मान्य केले जात नाहीत, तर लोकांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्याची त्यात किती क्षमता आहे व दुसरे म्हणजे अधिकतम लोकांच्या हितांच्या रक्षणाची क्षमता त्यांत किती प्रमाणात आहे ह्या आधारावर नेत्याच्या निर्णयाला पाठिंबा मिळतो. या विवेचनाच्या आधारावर नेतृत्वाची भूमिका व कार्ये तपासून पहाणे आवश्यक आहे.

### ब. शासनव्यवस्थेचे स्वरूप :

नेतृत्व ही राज्यव्यवस्थेच्या अंतर्गत चालणारी प्रक्रिया आहे ह्या राज्यव्यवस्थेचे स्वरूप कसे आहे? त्यात कायदेमंडळ, कार्यपालिका, न्यायालय, नोकरशाही इ शासनाचे अंग आहेत तसेच राजकीय पक्ष, दबावगट, प्रेस, भिन्न भिन्न आर्थिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय अशा उपव्यवस्थाचे जाळे पसरलेले असते ह्या सर्वांची परस्परावर क्रिया प्रतिक्रिया चालू असते आणि सर्व प्रक्रियांचा कारक असलेल्या माणसांचे स्वरूपही लक्षात घेतले पाहिजे रॉबर्ट डाल्हने आपल्या 'Modern Political Analysis' ह्या ग्रंथात लोकाचे चार प्रकारात वर्गीकरण केले आहे. राजकारणात स्वारस्य नसणारे लोक दारिद्र्य, शिक्षणाचा अभाव व अज्ञान ह्यामुळे उदासीन लोकाचा हा वर्ग तयार होतो. सामान्यतः अविकसित देशात ह्या वर्गाचे प्रमाण फार जास्त असते राजकीय लोकाचा विकसित देशात ह्या वर्गाचे प्रमाण बरेच असते राजकीय घटनावर भाष्य करणे निवडणुकीत घेणे, सभा, सम्मेलने, मिरवणुका ह्यात सहभागी होणे असे ह्या वर्गाचे स्वरूप होय लोकशाहीचे यश राजकीय लोकांच्यावर अवलंबून असते, राजकीय शक्ती प्राप्त करू इच्छिणाऱ्याचा वर्ग म्हणजे सत्तेची निरनिराळी पदे प्राप्त करण्यासाठी प्रत्यक्ष निवडणुका लढण्यापासून तर सर्व प्रकारच्या राजकीय कार्यात आघाडीवर असणारे लोक होय, राज्यव्यवस्थेच्या सर्वोच्च स्थानी असणारा शक्तीसंपन्न लोकाचा वर्ग हा संख्येने इतर वर्गाच्या तुलनेत अल्प प्रमाणात असतो. हा प्रत्यक्ष शासकाचा वर्ग होय हा निर्णय घेणाऱ्याचा वर्ग होय. डाल्हच्या चार श्रेणीपैकी पहिला उदासीन वर्ग सोडून बाकीचे तिन्ही वर्ग नेतृत्वाच्या प्रक्रियेत सहभागी होतात राजकीय वर्ग अनुयायींचा मानला तर शक्तीची लालसा असणारे व प्रत्यक्ष शक्तीसंपन्न हे दोन्ही वर्ग पुढाऱ्याचे वर्ग आहेत. सत्तास्पर्धा मुख्यतः ह्या दोन वर्गात असते सत्तास्पर्धा हे राजकीय नेतृत्वाचे लक्षण होय.

**क. नेतृत्व सत्ता स्पर्धा चढाओढ :**

राजकीय नेतृत्व सत्ता स्पर्धात प्रत्येक देशाच्या राज्यव्यवस्थेमधील नेतृत्वाच्या स्पर्धेचे स्वरूप शासनाच्या निर्णयासंबंधी विरोध व्यक्त करण्यासाठी नागरिकाना राज्यघटनेद्वारा दिलेले स्वातंत्र्य साम्यवादी देशात असे स्वातंत्र्य नसते, देशातील राजकीय पक्ष पद्धतीचे स्वरूप इंग्लंड अमेरिकेमध्ये द्विपक्षपद्धती आहे त्यामुळे नेतृत्व निवडीच्या दृष्टिने नागरिकांच्यासमोर मुख्यत दोन पर्याय आहेत' तर फ्रान्स, जर्मनी, भारत ह्या देशात बहुपक्ष पद्धतीमुळे नेतृत्व निवडीसाठी नागरिकाच्या समोर अनेक पर्याय असतात. शासक अथवा सत्ताधारी पुढाऱ्यांच्या घटनात्मकता किता सनदशीरपणाबद्दल विश्वास असणे अथवा त्याचा अभाव असणे देशाचे आर्थिक व सामाजिक स्वरूप औद्योगिक अर्थव्यवस्था आहे की कृषीप्रधान अर्थव्यवस्था आहे. तसेच मुक्त अर्थव्यवस्था आहे की, नियंत्रित अर्थव्यवस्था आहे. ह्या प्रत्येक प्रकारात नेतृत्वापुढील समस्या भिन्न असतात तसेच जाती, वर्ग, वर्ण, संप्रदाय बद्दल नागरिकाच्या निष्ठा कशा आहेत ह्यावर नेतृत्व स्पर्धा अवलंबून असते लोकशाहीत दबावगटांचे महत्त्व वाढत आहे.

**ड. नेतृत्वाच्या मर्यादा –**

नेतृत्वाची भूमिकेविषयी कौटिल्याने वैश्विक सत्याशी मानवधर्माची सांगड घालण्यासाठी वर्णाश्रम आधारावर समाजरचनेची जबाबदारी राजावर सोपविली आहे. हा भारतीय दृष्टिकोण राष्ट्रपिता म्हणून ज्यांना मान दिला जातो विशेषतः मकियावली पासून पाश्चात्य विचारवंत 'सेक्युलर स्टेटचा आग्रह धरतात म्हणजे 'राज्यसत्ता अधिभौतिक स्वरूपाची असते धर्मनिरपेक्ष म्हणजे संप्रदाय निरपेक्ष असते. पण प्रत्यक्षात राजकारणाचा समाजातील सर्वच अंगाशी संबंध येतो हे २० व्या शतकामधील बहुतेक राजकीय विचारवंतांनी मान्य केले आहे अशाप्रकारे राजकीय हा शब्द अतिव्याप्त असल्याने एखादे नेतृत्व राजकीय अथवा गैर राजकीय आहे असे म्हणणे ह्याला सीमित अर्थ आहे कारण प्रत्यक्षात गैर राजकीय नेतृत्वाची देखील प्रभावी राजकीय भूमिका असू शकते. ह्यावरून नेतृत्व व राजकीय नेतृत्व यामधील सीमारेषा अस्पष्ट आहेत नेतृत्वाला समूहाचे प्रयोजन, राज्यव्यवस्थेचे स्वरूप, समूहातील लोकांचे व्यक्तिमत्व, सत्तास्पर्धेचे स्वरूप ह्यावर नेतृत्वाची भूमिका अवलंबून असते

**रचनात्मक कार्यवादाच्या आधारावर नेतृत्वाचे कार्य :**

राजकीय नेतृत्वाच्या कार्यप्रणालीचे प्रारूप पाश्यात्य विचारवंत गॅब्रिएल आलमंडच्या मते, राज्यव्यवस्था अशी क्रिया प्रतिक्रियात्मक व्यवस्था असते की, ती संकलन व जुळण्याची कार्ये करते. डेव्हिड ईस्टनच्या मते, 'देशातील वातावरणाचा राज्यव्यवस्थेवर सतत परिणाम होत असतो. आपले अस्तित्व टिकविण्यासाठी परिस्थितीशी जुळवून घेण्याचा प्रयत्न असतो. त्यासाठी उद्दिष्टे व अंतर्रचना ह्यात आवश्यकतेनुसार बदल करावा लागतो. हे कार्य नेतृत्वाद्वारे केले जाते. समाज ज्या विशिष्ट वातावरणात असतो, त्यात राजव्यवस्थेची आल्मंडने मुख्यतः चार कार्ये सांगितली आहेत. निःसंदिग्धपणे ही नेतृत्वाचीच कार्ये आहेत.

१) **आदान कार्य** (Input functions)

२) **रूपांतर कार्य** (Conversion functions)

३) **प्रदान कार्य** (Output functions)

४) **प्रत्यादान कार्य** (Feedback functions)

समाजाच्या अनेक प्रकारच्या आवश्यकता असतात. ह्या आवश्यकता मागण्यांच्या रूपात येण्यासाठी त्यावर (अ) हितसंबंधाचे प्रगटीकरण (ब) हितसंबंधाचे सुसूत्रीकरण (क) राजकीय सामाजीकरण ह्या प्रक्रिया होतात. भिन्न क्षेत्रातील हितसंबंध लोकासमोर मांडून, त्यावर लोकांची संघटना तयार करणे, व प्रभावी रितीने ते राजकीय पक्षाचा कार्यक्रम बनवून त्यावर शासनाद्वारे अनुकूल आश्वासने मिळविणे हे नेतृत्वाच्या कार्याला आदान कार्य म्हटले जाते. नेतृत्व व कार्यकर्ते ह्याच्यामधील दुवा म्हणजेच राजकीय संसूचन होय समाजातील ही निरनिराळी कार्ये नित्य स्वरूपाची असतात तर परिस्थितीसापेक्षही असतात जसे स्वातंत्र्यपूर्व काळात टिळक गांधी ह्याचे नेतृत्व म्हणजे स्वातंत्र्याच्या मागणीसाठी निर्माण झालेले नेतृत्व होय, स्वातंत्र्यानंतर धर्मनिरपेक्षता, समाजवाद व लोकशाही मूल्यावर आधारित नेहरूंचे नेतृत्व निर्माण झाले विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात हिंदुराष्ट्रवाद, लोकशाही व स्वदेशीच्या आधारावरील वेगळ्याच पद्धतीचे भाजप सह संघ परिवाराचे नेतृत्त्व प्रभावी रितीने विकसित झाले. सर्वप्रकारच्या शासनव्यवस्थेत (लोकशाही, हुकुमशाही, सर्वाधिकारशाही) राजकीय पक्षाचे व दबावगटाचे महत्त्व विशेष प्रमाणात वाढले आहे. कारण लोकशिक्षण, निवडणुकापासून तर भिन्न हितसंबंधांच्या आधारावर त्यांचे प्रगटीकरण, सुसूत्रीकरण, संसूचन, राजकीय सामाजीकरण, कायदेमंडळाद्वारे नियम निर्मिती, कायद्याची अंमलबजावणी, शासनाला बहुमताचा पाठिंबा कायम ठेवणे ही राजकीय पक्षांची कार्ये मुख्यतः नेतृत्वाद्वारे केली जाणारी कार्ये आहेत.

**राजकीय नेतृत्वाची कार्ये :**

राजकीय नेतृत्वाच्या कार्याचा विचार आल्मंडप्रणित रचनात्मक कार्यवादाच्या आधारावर विचार केला आहे. संघटन कुशलता, व सामूहिक प्रयत्नातून आवश्यकतांच्या बाबतीत जागरुकता, परिस्थितीसंबंधी अंतर्दृष्टी, नवीन नवीन उपक्रमांबद्दल पुढाकार व ते पूर्ण करण्याची जिद्द तसेच आत्मविश्वासाने कार्य करणे ह्या सर्व नेतृत्वाच्या भूमिका आहेत. समाजातील एखादी प्रभावी व्यक्ती व नेता ह्या दोनमध्ये फरक असतो. तसेच लोकप्रिय व्यक्ती व नेता ह्यातही फरक असतो. हा फरक त्याच्या कार्याच्या आधारावरच असतो. जी व्यक्ती नेत्याचे कार्य करते तिला पुढारी म्हटले जाते. म्हणून व्यक्तिगत व सामूहिक पातळीवर मराठी विश्वकोशमध्ये नेत्यांच्या कार्याचे पुढीलप्रमाणे वर्णन करण्यात येत आहे. १) संयोजन समूहाच्या तत्कालिन गरजा, उपलब्ध साधने, दूरची उद्दिष्टे या अनुसार योजना आखणे २) धोरण निश्चिती अनुयायींच्या आवश्यकता, आशा व आकांक्षा ह्यांच्या आधारावर धोरण ठरविणे. ३) धोरणाची अंमलबजावणी आवश्यकतेनुसार त्यासाठी कार्य विभागणी करावी लागते. ४) तज्ञ ह्या नात्याने सहाय्य करणे सामान्य व्यक्ती प्रत्येक कार्यात जाणकार असतेच असे नाही. तथापि पुढारी मात्र जाणकार असल्याने त्याचेकडून सल्ला व मदत अपेक्षित असते. ५) समूहाचे

प्रतिनिधित्व लोकशाही शासनव्यवस्थेत तर ह्या पद्धतीला वैधानिकता प्राप्त झाली आहे. ६) समूहातील गटांवर नियंत्रण : एखाद्या मोठ्या समुदायात हितसंबंधाच्या आधारावर अनेक लहानमोठे गट निर्माण होतात. ह्या गटांमध्ये समन्वय व त्यांच्यावर नियंत्रण करावयाचे असते. ७) स्वतःचे आदर्श आचरणाद्वारे लोकप्रिय करणे : अनुयायी सामान्यतः नेतृत्वाचे अनुकरण करतात. ८) समूहाचा रक्षणकर्ता : अनेक बाबतीत पुढाऱ्यांची भूमिका कुटुंबप्रमुखासारखी असते. समूहात मानसिक समतोल राखून, विफलतेपासून समूहाचे रक्षण करावे लागते.

गिबच्या मते, 'नेतृत्व ही समूहाच्या अंतर्गत चालणारी क्रिया असल्याने, नेतृत्वाला समूहाचे सामान्य उद्दिष्ट अशा पद्धतीने निश्चित करावे लागते की, ज्यामुळे अनेकांना आपल्या अस्तित्वाद्वारे प्रत्येकाच्या काही गरजा पूर्ण होण्याचे समाधान प्राप्त होते. विविध निर्णय घेण्यासाठी पुढाकार घ्यावा लागतो. निर्णयांच्या पूर्तीसाठी सर्वांच्या सहकार्याने प्रयत्न करावा लागतो

**१) संस्था ध्येयनिश्चिती :** विशिष्ट ध्येय अथवा उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी आवश्यकता तथा बदलत्या परिस्थितीनुसार अंतिम तथा निकटचे ध्येय ठरवून अनेक मार्ग निश्चित करावे लागतात ह्यात नेत्याचे फार मोठे कौशल्य असते त्यात नेत्यांची दूरदृष्टी दिसून येते. कित्येक वेळा व्यापक उद्दिष्टाच्या प्राप्तीसाठी तडजोडी कराव्या लागतात.

**२) विशिष्ट उद्दिष्टासाठी जनसमर्थन** लास्वेलने 'Psychology and Politics' ह्या लेखात राजकीय नेतृत्वाच्या कार्याचे मनोवैज्ञानिक विश्लेषण केले आहे. त्याच्या मते, 'वैयक्तिक उद्दिष्टाला सार्वजनिक रूप देऊन त्याला लोकांचा अधिकाधिक पाठिंबा राजकीय नेतृत्व मिळवितात.' त्यासाठी मोर्चे, भाषण, सभा, संम्मेलने ह्याचा उपयोग केला जातो.

**३) सामाजिक, राजकीय, आर्थिक तसेच धार्मिक संबंधाचे कौशल्यपूर्ण व्यवस्थापन:** देशाची शासनयंत्रणा राजकीय पुढाऱ्यांच्याद्वारे चालविली जाते. त्यासाठी समाजातील भिन्न प्रकारच्या संबंधामध्ये समन्वय साधावा लागतो. हॅरी एस् दुमनने म्हटल्याप्रमाणे सर्व शासनकर्ते हे मूलतः राजकीय पुढारी असतात लोकांना काय हवे अथवा नको ह्याचे त्यांना ज्ञान असते. म्हणून जुळवणीचे कार्य अत्यंत कौशल्यपूर्ण करणे हे राजकीय नेतृत्वाचे महत्त्वाचे कार्य होय

**४) व्यवस्थित पुढाकार घेणे :** मेरियमच्या मते 'दबाव न टाकता पुढाकार घेतल्यास त्याचे परिणाम अधिक स्थायी स्वरूपाचे असतात. विविध पक्ष, कुटुंब, धार्मिक संस्था, विधीमंडळ आदी संस्थांमध्ये पुढाकार घेणे महत्त्वाचे कार्य आहे.'

**५) आर्थिक हितसंबंधाच्या आधारावर पुढाकार घेणे :** मानवी जीवनात आर्थिक हितसंबंधांना बरेच वरचे स्थान आहे. आतापर्यंत केलेल्या अनेक सर्वेक्षणातून असे स्पष्ट झाले आहे की, आर्थिक हितांचे रक्षण व त्यासाठी विविध जुळवणी तथा उद्योजकांची कार्ये करणे ह्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

**६) समस्यांची यशस्वी सोडवणूक :** अमेरिकन लेखक पॉल एच. नित्शे ह्यांना असे वाटते की, अनेक प्रकारच्या समस्यांना यशस्वी रितीने सोडविण्यात राजकीय नेतृत्वाच्या कार्याचे इंगित असते.

**७) मार्गदर्शन करणे:** राजकीय नेतृत्व हे व्यक्तींना जीवनाच्या अनेक क्षेत्रात मार्गदर्शन करीत असतात जसे नोकरी, व्यवसाय, शिक्षण, नातेसंबंध, विवाह, स्वास्थ्य, सामाजिक समस्या, वैयक्तिक खाजगी समस्या अशा अनेक बाबतीत कोणाच्या तरी मार्गदर्शनाची आवश्यकता असते. ज्या व्यक्ती हे कार्य यशस्वी रितीने करतात, त्यांना त्यांचे अनुयायी पुढारी म्हणून मानतात.

८) राजकीय नेतृत्व लोकशिक्षण आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आचरणाद्वारे लोकांचे उद्‌बोधन केले जाते.

## १.४.५ राजकीय नेतृत्वाचे बदलते स्वरूप

### नेतृत्वापुढील उद्दिष्टे व मूल्ये ह्यातील परिवर्तन

औद्योगिक क्रांतीनंतर पाश्चात्य देशांच्या आर्थिक सामाजिक व राजकीय परिस्थितीमध्ये आमूलाग्र बदल झाला. ह्या क्रांतीची सुरुवात इंग्लंडपासून झाली. यांत्रीकीकरणाबरोबर इतरही देशांमध्ये हळूहळू क्रांतीचा प्रभाव वाढू लागला. युरोपच्या राजकारणात जर्मनीचे महत्त्व वाढले. जर्मनी अखंड राष्ट्र बनला युद्धाच्या खाईत लोटणाऱ्या हिटलरला आजही जर्मनीत आदराचे स्थान आहे. प्रखर राष्ट्राभिमान हा जर्मनीचा स्थायीभाव आहे. रशियाच्या वाताहतीमुळे जर्मनी जगातील तिसऱ्या क्रमांकाचा औद्योगिक देश म्हणून ओळखल्या जातो. अमेरिकेची संयुक्त राज्ये म्हणून ओळखल्या जाणारे हे प्रजासत्ताक संघात्मक गणराज्य अत्यंत समृद्ध व संपन्न देश आहे. सामाजिक-राजकीय जागृती झाली आहे. त्यांना मिळणाऱ्या निकृष्ट वागणुकीमुळे, निग्रो राज्याची मागणी वाढत आहे. त्यांच्यामधील जहाल वर्गामुळे अमेरिकेच्या बलाढ्यतेला तडा जाऊन, त्याचे जागतिक नेतृत्व समाप्त होण्याची शक्यता त्या काळात मध्ये नाकारता येत नव्हती. समाजात ऐहिक वैभव आहे पण निष्ठा व मूल्ये निर्माण करणे ही मोठी समस्या अमेरिकेच्या नेतृत्व समोर होती.

रशिया एकेकाळी 'जागतिक सुपर पॉवर' म्हणून ओळखल्या जाणारा रशिया आर्थिक संकटात टिकविण्यासाठी सध्या धडपड करीत आहे. जगातील सर्वात मोठा प्रदेश लाभलेला एकमेव देश, १९१७ च्या साम्यवादी क्रांतीनंतर, शेती प्राधान्यता व मागासलेपण सोडून, भूमिहीनांना जमीन, उद्योगांचे प्रचंड राष्ट्रीयीकरण, सामुदायिक शेतीमुळे दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील दुसऱ्या क्रमांकाचा औद्योगिक देश बनला. ह्या दरम्यान रशियाची आर्थिक स्थिती ढासळली. १९८५ मध्ये रशियाचे अध्यक्ष मिखाईल गोबार्चेव्ह ह्यांनी ग्लासनोस्त (खुलेपणा) व पेरिस्त्राईका (पुनर्रचना) ह्या नवीन धोरणानुसार साम्यवादी पक्षावर बंदी घालून लोकशाहीसाठी मार्ग खुला करून दिला. रशियाची विस्कटलेली आर्थिक घडी सावरण्यासाठी युरोपीय देश व अमेरिकेला सहकार्य मागितले, रशियाच्या पोलादी पकडीतून हंगेरी, रूमानिया आदी अनेक देशांनी आपली सुटका करून घेतली आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील हजार वर्षांचा प्रदीर्घ काळखंड म्हणजे काही सोनेरी पाने वगळल्यास, परकीय आक्रमणांचा व भारताच्या गुलामगिरी तथापि इंग्रजांच्या शेवटच्या काळात एक केंद्रीभूत अधिसत्ता भारतात निर्माण होऊन एक प्रशासन व्यवस्था अस्तित्वात आली. पुढे ह्या मध्यमवर्गातून राजकीय नेतृत्व उदयाला येऊन त्याने स्वातंत्र्य आंदोलनाद्वारे ब्रिटिश राजसत्तेला आव्हान दिले. प्रारंभी सामाजिक सुधारणांनी सुरुवात होऊन भारताचा स्वातंत्र्योत्सव दिल्लीत राजकीय नेतृत्वाद्वारे थाटात साजरा झाला.

भारताच्या राजकीय नेतृत्वात भारताच्या सामाजिक–आर्थिक तथा राजकीय व्यवस्थेच्या अंतरंगात स्वातंत्र्योत्तर काळात आमूलाग्र बदल झाला. संसदीय लोकशाही मताधिकार व कल्याणकारी राज्यव्यवस्थेत नागरिकांचा भौतिक विकास हा सार्वभौम गणराज्याचा आधार मानण्यात आला. ह्या बाबतीत भारताचे अन्य नवोदित आशियायी व आफ्रिकी देशांच्या संदर्भात वेगळेपण दिसून येते. मताधिकारातून परंपरागत जातीव्यवस्थेचे राजकीयकरण झाले आहे. शिक्षण संस्था, पंचायत समित्या तथा सहकारी संस्थांद्वारे जाती समूहांचे 'दृढीकरण' करण्यात आले आहे. उत्तर भारतात जाट, यादव, राजपूत, पंजाबात शीख, तामिळनाडूत नाडर, आंध्रमध्ये रेड्डी व कम्मा, महाराष्ट्रात मराठी–कुणबी ह्या जाती राजकीय दृष्ट्या शक्तीशाली असून नवे नेतृत्व ह्या जातींमधून साकार झाले आहे ह्यापूर्वी ब्राम्हण, राजपूत तथा कायस्थ ह्या जातीच्या नेत्यांचे प्रमाण उच्च नेतृत्वात अधिक होते.

इतर जातींमध्ये राजकीय जागृती होऊन, त्यांचे मतदानाचे प्रमाण वाढले व प्रतिनिधींची संख्या वाढून राजकारणात त्यांचे महत्त्व वाढले. विशेष लक्षणीय म्हणजे अनुसूचित जाती व जमातींचे यथावकाश राजकीय सामाजीकरण झाले आहे. शिक्षण व राजकारण तथा नोकऱ्यांत आरक्षणाचा त्यांनी उपयोग केल्याचे आढळून आले. भारतातील सर्व अनुसूचित जाती–जमातींमध्ये, महाराष्ट्रातील महार जातीने आपली स्थिती सुधारण्यासाठी राजकीय साधनांचा सर्वाधिक उपयोग करून संसद, विधीमंडळात सुरक्षित प्रतिनिधित्व पदरात पाडून घेतले आहे. डॉ आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली बौद्ध धर्म स्विकारला. ग्रामीण भागांत शिक्षणाचे प्रमाण वाढले तसेच महिलांचेदेखील शिक्षणाचे प्रमाण वाढले. ह्यातून राजकीय सामाजीकरणाबरोबर नवे नेतृत्व विकसित झाले. हे नेतृत्व जुन्यापेक्षा व्यक्तीवादी, गैर संस्थावादी असून शिक्षण तथा अनुभवामुळे त्यांचे कौशल्य वाढले आहे आरक्षण, गुणवत्ता ही देखील समस्या बनली आहे.

**नेतृत्वात होणाऱ्या परिवर्तनाचे ठळक मुद्दे**

१. सर्व पाश्चात्य देशांत औद्योगिक क्रांतीनंतर, कृषीवरील उपजिविकेचे प्रमाण घटले व औद्योगीकरण वाढले. देशांची आर्थिक समृद्धी वाढली. सर्व देशांमध्ये शिक्षणाच्या विस्ताराचा परिणाम म्हणजे सामाजिक व राजकीय जाणीव जागृती व मध्यमवर्गाची वाढ होय. देशाचे नेतृत्व करणाऱ्यात हाच वर्ग पुढे असून राजकीय क्षेत्रांत लोकशाहीचे दृढीकरण, राजकीय पक्षांचा विकास तथा दबावगटांच्या क्रियाशीलतेबरोबर नेतृत्वाचा विकास झाल्याचे आढळून येते.

२. भारतात स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाच्या प्रसारामुळे मध्यम वर्गाची निर्मिती झाली तथापि शेतकऱ्यांच्या नेतृत्वांत लक्षणीय वृद्धी दिसून आली. शेतीच्या औद्योगीकरणासोबत सहकारी संस्था, पंचायती समित्या तथा शिक्षण संस्थाच्याद्वारे नेतृत्व क्रियाशील दिसून येते. जातींचे राजकीयकरण हे विशेष होय.

३. प्रत्येक देशात आर्थिक समृद्धी आवश्यक आहे व त्याचबरोबर सामाजिक तथा राजकीय एकात्मता आवश्यक आहे. भारतात हिंदू-मुस्लिम समस्या भारताच्या एकता व अखंडतेला धोका बनली आहे. ही समस्या सोडविणे हे भारतीय नेतृत्वापुढे आव्हान आहे.

**नेतृत्वामधील परिवर्तनाची वाटचाल** - राजकीय नेतृत्व हे स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये प्रखर ध्येयवाद व उच्च कोटीच्या जीवनमूल्यांचा आग्रह, साधेपणा असणारे होते. हे आजच्या नेतृत्वांत दिसून येतो अशी भारतात सर्वत्र दाखवले जाते. आज जीवनमूल्यातील घसरण, भ्रष्टाचारासंबंधी चिंता व्यक्त केली जाते. इंग्लंडमध्ये राजा व संसद ह्यांच्यामध्ये प्रभुत्वासाठी शेकडो वर्षे संघर्ष चालू होता. शेवटी संसदेचा विजय झाला. हळूहळू नागरिकत्वाचा विस्तार झाला व सार्वभौम संसद प्रातिनिधिक बनली. 'बिल ऑफ राईटस्'मुळे नागरिकांचे अधिकार सुरक्षित झाले पण मार्क्सच्या वर्गसंघर्ष रक्तक्रांतीच्या विचारप्रणालीचा इंग्लिश नेतृत्वावर प्रभाव पडू शकला नाही अमेरिकेच्या काँग्रेसने, जेफरसन, अॅडम्स, फ्रैंकलीन, शरमन, लिव्हिंगस्टन ह्या पाच पुढाऱ्यांच्या पुढाकाराने, ४ जुलै १७७६ ला स्वातंत्र्याचा जाहीरनामा घोषित केला. त्यात 'मानवाची समानता व स्वातंत्र्य' ह्या निसर्गदत्त अधिकारांचे रक्षण करणे हे शासनाचे उद्दिष्ट मानले. यशस्वी स्वातंत्र्ययुद्धानंतर, जॉर्ज वॉशिंग्टनने संघराज्याच्या निर्मितीवर भर दिला. संघराज्याच्या निर्मितीबरोबर एक नवीन नेतृत्त्ववर्ग उदयाला आला. विश्वाचे नेतृत्व अमेरिकन पुढाऱ्यांनी केले. ह्या काळात जगाची विभागणी अमेरिका व रशिया अशा परस्परविरोधी दोन गटांमध्ये झाली. साम्यवादाला रोखण्यासाठी अमेरिकेने नाटो, सिएटो, सेंटो आदी लष्करी कराराबरोबरच जगभर अण्वस्त्रे-क्षेपणास्त्रे तथा सैन्यतळ उभारले व मित्र राष्ट्रांच्या संरक्षणाची जबाबदारी घेतली. काही वर्षांपूर्वीपासून एक कल्याणकारी राज्य बनून जगाचे नेतृत्व करणे हे अमेरिकन पुढाऱ्यांचे उद्दिष्ट आहे. स्वातंत्र्य व समतेवर आधारित लोकशाही हे जीवनमूल्य मानले जाते. मानवतेच्या संरक्षणाच्या नावाखाली अमेरिकेचा एक नवसाम्राज्यवाद अस्तित्वात आल्याचे दिसून येते. रशियाचे विघटन घडवून जगात एकमेव सत्ताकेंद्र अमेरिकेने निर्माण केले असले तरी जर्मनी-जपानच्या प्रचंड यांत्रीकीकरण व आर्थिक समृद्धीमुळे अमेरिकेला राजकीय शह प्राप्त झाला. हळूहळू साम्यवादाच्या रसायनाचा प्रभाव कमी होऊन उत्पादन घसरले. आर्थिक तणावामुळे व युरोपीय बाजारपेठेचे फायदे मिळावेत म्हणून प्रे. गोर्बाचेव्ह ह्यांनी 'ग्लासनोस्त पेरिस्त्राईकाद्वारे' (खुलेपणा व पुनर्रचना) साम्यवादाला सोडचिठ्ठी देऊन बंदिस्त केले व लोकशाहीचा मार्ग प्रशस्त केला. रशियन छत्राखालून हंगेरी, रूमानिया, बल्गेरिया आदी देश मुक्त झाले आहेत व रशियाचे अस्तित्व धोक्यात आले. साम्यवादापासून लोकशाहीपर्यंत रशियन नेतृत्वाचा प्रवास म्हणजे जीवनमूल्यातील महत्त्वपूर्ण परिवर्तन होय.

भारतात ब्रिटीश सत्ता असतानाच सामाजिक सुधारणा व स्वातंत्र्य आंदोलनाचे वारे महाराष्ट्र व बंगालमध्ये वाहू लागले होते. स्वातंत्र्य आंदोलनाचे नेतृत्व लो. टिळक, लाला लालजपत रॉय व बिपिनचंद्र पाल ह्यांनी केले. त्यांच्या मते हजार वर्षांच्या गुलामीमुळे भारतीय समाजव्यवस्था भ्रष्ट व पतीत बनली. तेव्हा जनजागृतीद्वारे 'स्वातंत्र्य व सुधारणा' ह्या प्राचीन भारतीय संस्कृतीच्या जीवनमूल्यांच्या आधारावर आंदोलन करण्याचा त्यांनी संकल्प केला. ब्रिटीश सत्तेला 'वरदान मानणारी ना. गोखले-आगरकर ही सुधारणावादी नेमस्त पुढारी मंडळी होती. त्यांच्यापूर्वी म. ज्योतिबा फुले ह्यांनी सामाजिक सुधारणेसाठी सत्यशोधक

चळवळ सुरू केली. गांधीजींनी सामाजिक सुधारणेचा वारसा गोखल्याकडून तर स्वातंत्र्य आंदोलनाचा वारसा लो. टिळकांकडून घेतला. स्वातंत्र्य आंदोलनातील नेतृत्व ध्येयवादी, त्यागी, निस्पृह व राष्ट्रवादी होते. ह्यातून डॉ. हेडगेवारांच्या रूपाने हिंदुराष्ट्राचे पुनरुत्थान अभिप्रेत असलेले राष्ट्रव्यापी नेतृत्व विकसित झाले.

पं नेहरू, जयप्रकाश नारायण, आचार्य नरेंद्र देव, अशोक मेहता आदींचा होता. ह्यांच्यावर 'मार्क्सच्या समाजवादाचा' प्रभाव होता. मुस्लिम समस्येसाठी 'सेक्युलरवाद' हा त्यांचा उपाय होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पं. नेहरू काँग्रेस तथा भारत सरकारचे सर्वोच्च नेतृत्व बनले. आर्थिक क्षेत्रातील पाश्चात्य 'उपभोक्ताप्रधान अर्थव्यवस्थेने ते प्रभावित झाले होते. त्यासाठी तथाकथित समाजवादी समाजरचनेचा प्रयोग सुरू झाला. तथापि औद्योगीकरण व कृषि उत्पादनाची गती विशेष वाढली. गांधीजींच्या कुटीर उद्योगांवर नेहरूंचा विश्वास नव्हता. गरीबी हटाओचे नारे देऊन सत्ता मिळविली जाते पण प्रत्यक्षात गरीबी वाढतेच आहे. पुढे उदारीकरण खाजगीकरण जागतिकीकरणाच्या LPG च्या धोरणातील राजकीय नेतृत्वाचा प्रवास, पुढे ज्या देशात नागरिकांमध्ये प्रखर राष्ट्रवाद निर्माण झाला सद्यस्थितीतील राजकीय नेतृत्व भारत देशाला समृद्धीच्या शिखरावर विकसित व शक्तीसंपन्न बनण्यासाठी  कोणते प्रयत्न करणार या वरती त्या देशातील राष्ट्रीय नेतृत्वाचे  यश अवलंबून आहे.

**कार्यकारी नेतृत्वाचा वाढता प्रभाव :**

प्रातिनिधीक लोकशाही मधील राजकीय नेतृत्व अभ्यासत असताना विसावे शतक लोकशाहीचे शतक मानले जाते. लोकशाहीत लोकप्रतिनिधींच्या हाती शासनाची सत्ता असते. विशेषतः संसदीय पद्धतीत प्रस्थापित झालेली असते. प्रा. लॉस्कीच्या मते, 'इंग्लंडची संसद इतकी शक्तीशाली आहे की, स्त्रीचा पुरुष व पुरुषाची स्त्री बनविण्याचा आदेश सोडून, कोणताही कायदा करू शकते.' घटनात्मक दृष्ट्या श्रेष्ठ असलेली संसद आज प्रत्यक्षात मात्र किती दुर्बल झाली आहे हे या विधानावरून स्पष्ट होते.

कार्यकारी मंडळाचा वास्तविक प्रमुख ह्या नात्याने पंतप्रधानाचे अधिकार वाढतच आहेत. संसदेचे सत्र बोलाविणे, स्थगित करणे, लोकसभा बरखास्त करणे, राज्यसभेत १२ सदस्यांची नियुक्ती करणे ह्या बाबतीत तो राष्ट्रपतीला सल्ला देतो. तो बहुमत पक्षाचा नेता ह्या नात्याने संसदेचा नेता तथा बहुधा राजकीय पक्षाचा अध्यक्ष असतो. तो मंत्रीमंडळाचा निर्माता तसेच अध्यक्ष असतो. अमेरिकेचे अध्यक्षपद एक शक्तीशाली कार्यकारी नेतृत्व अमेरिकेचे अध्यक्षपद जगामध्ये एक असाधारण पद आहे ह्या अध्यक्षपदामध्ये इंग्लंडचा राजा व पंतप्रधान ह्या दोन्ही पदांचे एकत्रीकरण झाले आहे. अध्यक्ष प्रमुख प्रशासक तसेच वास्तविक शासक आहे. त्याच्या नावाने देशाचा कारभार चालतो. हे अध्यक्षपद एक मानाचे पद राहील अशी घटनाकारांची अपेक्षा होती. पण प्रत्यक्षात ते एक शक्तीमान निर्वाचित पद बनले आहे. त्याच्या व्यक्तिमत्वाची छाप अमेरिकेच्या धोरणावर पडलेली दिसून येते. अनेक बाबतीत पंतप्रधानापेक्षा अध्यक्ष शक्तीशाली आहे. त्याच्या मंत्र्यांचा सल्ला त्याला बंधनकारक नसतो. अब्राहम लिंकन, थिओडोर रुझवेल्ट, फ्रँकलिन रुझवेल्ट, जॉन एफ. कॅनेडी हे शक्तीशाली अध्यक्ष होते. त्यांनी आपल्या कार्यकारी सत्तेचा उपयोग देशाच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी करून अमेरिकेला एक महाशक्तीशाली देश बनविले. परिणामी अमेरिकेला 'जागतिक नेतृत्व' प्राप्त झाले.

**राजकीय नेतृत्वाचा डिजिटल मार्केटिंग कडे प्रवास :**

कार्यकारी नेतृत्वाचा प्रभाव वाढला आहे. संसद श्रेष्ठ असली तरी जेनिंग्जच्या मते प्रत्यक्षात कार्यकारी नेतृत्व (मंत्रीमंडळ) श्रेष्ठ असते. ज्याच्या हातात देशाच्या 'तिजोरीची किल्ली तो मालक' ह्या नैसर्गिक न्यायाने कार्यकारी नेतृत्व प्रभावी, आधुनिक काळात 'कल्याणकारी राज्य' ह्या राज्यव्यवस्थेच्या मान्यतेमुळे प्रशासनाची कार्ये वाढली.

आधुनिक काळात शहरीकरणाची झपाट्याने वाढ झाली आहे. सामाजिक व भौगोलिक गतिशीलता वाढली आहे. सामाजिक, राजकीय क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहेत. अनेक सार्वजनिक प्रश्न लोकांच्या समोर मांडून लोकशाही पद्धतीने त्यांचा पाठिंबा मिळविणे सहज शक्य झाले आहे. सर्वोच्च पुढाऱ्यांना दूरदर्शन (TV) वरून प्रत्यक्ष पाहता येते. त्यांचे विचार व विविध समस्यांवरील त्यांचे मार्गदर्शन प्रत्यक्ष रूपाने मिळत असल्यामुळे जनमत निर्मितीवर प्रचंड प्रभाव पडत आहे. दृक श्राव्य छायाचित्रीकरणाद्वारे तथा टी.व्ही.ची सोय नाही अशाही ठिकाणी डीजीटल व्हॅनच्या माध्यमातून सर्वत्र दाखविता येते ह्याचाच दुसरा लोकप्रिय प्रकार म्हणजे सिनेमा. भारतामधील अनेक प्रमुख राजकीय पुढारी, सिनेमातील नायक-नायिका म्हणून अतिशय लोकप्रिय झालेत. त्यानंतर त्यांनी राजकारणात आपल्या लोकप्रियतेचा उपयोग केला. वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके तथा पुस्तके ह्यांचा टी.व्ही., रेडिओपेक्षा पडणारा प्रभाव संथ गतीचा आहे. वर्तमानपत्रातील संपादकीय, स्तंभ लेखकांचे राजकीय विश्लेषण, जाहिराती व बातम्या ह्यांचा वाचकांवर प्रभाव पडतो, पण त्याचबरोबर वाचकाच्या आवडी-निवडीचा देखील वर्तमानपत्रांवर संथगतीचा होत आहे. व्यक्तिगत संपर्काच्या दृष्टीने पत्रव्यवहार, दूरध्वनी (टेलिफोन), तार (टेलिग्राम) ह्याचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. हजारो मैल दूर असलेल्या आपल्या प्रमुख अनुयायींशी, थोड्याच वेळात अनेकाशी बोलणे करता येते, तर पत्राने प्रभावी रितीने आपल्या भावना अनेकांना कळविता येतात. पण प्रत्येकाला लिहिलेले पत्र व्यक्तिगत असल्यामुळे त्याचा प्रभाव फार जास्त पडतो. मात्र सध्या परिस्थितीत नेतृत्व प्रक्रियेत अत्यंत महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत. संसूचन साधनांना नेतृत्वाचा आवश्यक घटक मानले आहे. २०१९ पासून व्हाट्सअप फेसबुक ट्विटर इंस्टाग्राम स्नॅपचॅट रीलच्या माध्यमातून डिजिटल मार्केटिंगचा संसूचन साधन म्हणून वापर अलीकडील काळात वाढला आहे. जगातील युद्धजन्य स्थिती, भिन्न प्रकारचे राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय तणाव, आर्थिक अस्थैर्य, शहरीकरण, ह्यामुळे पूर्वी साधारणपणे औद्योगिक केंद्रांमध्ये असलेली सत्तास्थाने कार्यकारी नेतृत्वात परिवर्तित होत आहेत. ह्यामुळे अमेरिका तथा फ्रान्सचा अध्यक्ष, इंग्लंड तथा भारताचा पंतप्रधान देशाच्या राजकारणात प्रभावी बनले आहेत त्यांचा प्रभाव अधिक व्यापक प्रमाणात वाढविण्याचे कार्य ह्या संसूचननाच्या प्रसार माध्यमाने विशेष कार्यक्षमतेने केले आहे. म्हणून ह्या साधनांना नेतृत्व प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान आहे. राजकीय नेतृत्वाचा २००४ ते २०१४, २०१९ ला एकहाती सत्तेचा कालखंड या कालावधीमध्ये सलग दोन पंचवार्षिक वर्षामध्ये काँग्रेसची सरकारे आली. काँग्रेसच्या दृष्टीने पहिली टर्म यशस्वी ठरली असली तरी दुसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये काँग्रेसची कामगिरी निराशाजनक राहिली. २००९ नंतर आलेल्या डॉ. सिंग सरकारच्या काळात घोटाळ्यांची मालिका सुरू झाली. कोळसा घोटाळा, ऑलिम्पियाड घोटाळा यासारखी प्रकरणे मांडण्यात विरोधकांना यश आले पुढे २००९ नंतर भाजपने गुजरातचे मुख्यमंत्री

नरेंद्र मोदी यांना भावी पंतप्रधान म्हणून प्रोजेक्ट केले. त्यासंबंधीचा प्रचार भाजपने सोशल मिडियाद्वारे प्रभावीपणे केला २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या निकालाचे वर्णन लोकजनशक्ती पक्षाचे नेते रामविलास पासवान यांनी 'मोदी त्सुनामी' असे केले आहे मात्र लोकसभेच्या २०२४ निवडणुकीतमध्ये मात्र जनमत लोकशाही राजकीय नेतृत्वाचा अनुकूल असल्याचा आशावाद लोकशाही व्यवस्थेने दिला आहे.

## १.५ सारांश :

प्रत्येक देशाच्या राजकीय नेतृत्वाचा पूर्वेतिहास भिन्न असला राजतंत्र तर हुकुमशाही परकीय शासन तरीही विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सर्वत्र लोकशाहीबद्दल आस्था आहे. मग ती उदारवादी लोकशाही असो की बंदिस्त लोकशाही असो. कारण जागतिक जनमत लोकशाहीला अनुकूल आहे. त्यामुळे सर्व प्रकारच्या राजकीय नेतृत्वाला लोकशाहीची जपणूक करावीच लागते व स्वातंत्र्य-समता तथा मानवता ह्या मूल्यांचाही आदर करावा लागतो.

## १.६ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ:

१. **पुढारी :** पुढाकार घेणारा

२. **कार्यकर्ता:** जे 'सक्रीय भूमिका वठविणारे असतात त्यांना कार्यकर्ता असे म्हणतात'.

३. **श्रेष्ठीजन :** सर्व नागरिक सत्ता गाजवितात असे नाही म्हणजे प्रत्यक्ष सत्ता गाजविणारे थोडे लोक असतात अर्थात ते सर्वांच्या वतीने गाजवितात त्यांना श्रेष्ठीजन असे म्हणतात.

**१.७ स्वाध्याय**

अ) स्वंय अध्ययनासाठी प्रश्न

१. प्राचीन तसेच मध्ययुगीन काळातील भारतीय सिद्धान्तानुसार राजनेत्याला अभिषेकाच्या वेळी कोणत्या संहितेनुसार शपथ घ्यावी लागते.

२. पुढारी व नेतृत्व या शब्दात कोणत्या विचारवंतानी फरक केला आहे.

३. भारतात सर्वप्रथम आध्यात्मिक राष्ट्रवादाचा पुरस्कार कोणी केला.

४. नेत्याच्या वर्तनाच्या अभ्यासावर कोणत्या विचारवंतानी अधिक भर देण्यासाठी?

ब) स्वंय अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे

१. 'धर्मदंडयोस्मि' अशी शपथ

२. मॅक्स वेबर

३. विवेकानंद

४. चार्लस मेरियम

क. अध्ययनासाठी प्रश्न

१. टिपा लिहा :

१. नेतृत्वाची संकल्पना

२. वलयांकित नेतृत्व

३. रचनात्मक कार्यवादाच्या आधारावर नेतृत्वाचे कार्य

४. सुधारणावादी नेतृत्व

२. अध्ययनासाठी प्रश्न

१. राजकीय नेतृत्वाची संकल्पना सांगून प्रकार स्पष्ट करा.

२. राजकीय नेतृत्वाचे आधारभूत घटक स्पष्ट करा.

३. राजकीय  नेतृत्वाचे बदलते स्वरूपावर चर्चा करा.

४. राजकीय नेतृत्वाची भूमिका व कार्ये स्पष्ट करा.

## १.८ अधिक वाचनासाठी


१. खेकाळे. ना रा., १९९९ ‘राजकीय नेतृत्व’ श्रीमंगेश प्रकाशन, नागपूर.

२. पवार प्रकाश, भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल डायमंड प्रकाशन पुणे.

३. इनामदार व वकील, (संपा) (१९८४) आधुनिक राजकीय विश्लेषण, शुभदा सारस्वत पब्लिकेशन्स प्रा.लि. पुणे.

४. आवारी, विलास व देवरे सुरेश, (२०११) आधुनिक राजकीय विश्लेषण, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे

५. खंडागळे चंद्रकांत (२०२१) राजकीय समाजशास्त्र, मायादेवी खंडागळे प्रसाद ग्राफिक्स, सांगली


❑❑❑

## घटक २
## राजकीय संसूचन

**अनक्रमणिका**

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

- २.२.१ राजकीय संसूचनाचा अर्थ, व्याख्या आणि स्वरूप
- २.२.२ राजकीय संसूचनाचा विकास
- २.२.३ राजकीय संसूचनाचे प्रकार
- १.२.४ कार्ल ड्वाईश – राजकीय संसूचनाचा सिद्धांत
- २.२.५ राजकीय संसूचनाची साधने

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द

२.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ सरावासाठी स्वाध्याय

२.८ संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला खालील गोष्टी समजून येतील.

१. राजकीय संससूचानाचा अर्थ, व्याख्या आणि स्वरूप लक्षात येईल.

२. राजकीय संसूचनाचा विकास कसा झाला याचा आढावा घेता येईल.

३. राजकीय संसूचनाचे प्रकार समजतील.

४. कार्ल ड्वाईश – राजकीय संसूचनाचा सिद्धांत चर्चा करता येईल.

५. राजकीय संसूचनाची साधने कोणती आहेत हे समजेल.

## २.१ प्रास्ताविक

राज्यशास्त्राच्या अभ्यासामध्ये अनेक उपशाखा उदयास आलेल्या आहेत. त्यामध्ये आधुनिक राजकीय विश्लेषण ही एक आहे. आधुनिक राजकीय विश्लेषणामध्ये राजकीय विकास, राजकीय सामाजीकरण, राजकीय आधुनिकीकरण, राजकीय संसूचन इत्यादी अनेक संकल्पना विकसित झाल्या आहेत. त्यामध्ये राजकीय संसूचन ही एक महत्वाची संकल्पना आहे. राजकीय संसूचन म्हणजे राजकीय संदेशांचा अभ्यास असतो जो सामान्य जनतेपर्यंत पोहोचवला जातो. ते पोहचविण्यासाठी राजकीय मोहिमा, भाषणे आणि राजकीय जाहिराती, बहुतेकदा मास मीडिया इत्यादी साधनाचा वापर केला जातो. हे एक आंतरविद्याशाखीय क्षेत्र आहे. जे संप्रेषण अभ्यास आणि राजकीय विज्ञानातून येते. राजकीय संसूचन माहिती प्रवाह, राजकीय प्रभाव, धोरण तयार करणे, बातम्या आणि जनमत यासारख्या कल्पनांशी संबंधित आहे. हे क्षेत्र राजकीय, सामाजिक माध्यमे, प्रचार, संप्रेषणाची राजकीय अर्थव्यवस्था आणि राजकीय प्रक्रियांवर परिणाम करण्यासाठी संपर्क साधणाऱ्या अशासकीय संस्थांच्या अभ्यासावर देखील लक्ष केंद्रित करते. या क्षेत्रावर परिणाम करणाऱ्या आधुनिक सामाजिक बदलांमध्ये माध्यमांचे डिजिटायझेशन, ध्रुवीकरण आणि सत्योत्तर माध्यमाकडे वाटचाल इत्यादी घटकांचा समावेश होतो.

## २.२ विषय विवेचन

राजकीय संसूचन सिद्धांत हा राज्यशास्त्रीय आधुनिक राजकीय विश्लेषण क्षेत्रात अगदी अलीकडे आलेला मात्र विकसित होण्याच्या दृष्टीने तो अति जलद क्षमतेचा समजला जातो. माहिती नियंत्रण शास्त्रावर तो मूलता आधारित आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर विज्ञान तंत्रज्ञानात जी भर पडली त्याचा विशेष परिणाम स्थापत्यशास्त्र व बौद्धिक शास्त्रे यांच्यात अमुलाग्र बदल होण्यात झाला. हा बदल केवळ त्या शास्त्रापुरताच मर्यादित राहिला नाही. तर तो सामाजिक शास्त्रातही झाला. तसे तो राज्यशास्त्रात विकसित झाला. राज्यशास्त्रामध्ये आज राजकीय संसुचनाला आधुनिक शास्त्रीय व तुलनात्मक आंतरराष्ट्रीय असा दृष्टिकोन प्राप्त झाला. तो आधुनिक राजकीय विश्लेषण म्हणून ओळखला जातो. त्यात विशेष करून समाजशास्त्र, मानसशास्त्र व नैसर्गिक शास्त्रे यातील सिद्धांत उचलून राज्यशास्त्रीय विश्लेषणाला लागू करण्यास सुरुवात झाली त्याची परिभाषाही यात रूढ होत चालली आहे.

राजकीय संसूचन ही राजकारणी, वृत्तमाध्यमे आणि जनतेमध्ये माहिती प्रसारित करण्याशी संबंधित एक परस्परसंवादी प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया शासक संस्थांपासून नागरिकांपर्यंत, राजकीय नेत्यामधील सहजता आणि सार्वजनिक मतापासून अधिकाऱ्यांपर्यंत वरच्या दिशेने चालते. राजकीय संसूचन नेहमीच निवडणूक आणि धोरणनिर्मिती प्रक्रियेत केंद्रस्थानी राहिले आहे. परंतु १९९० च्या दशकाच्या सुरुवातीपासून काही महत्त्वाच्या घडामोडींमुळे ही प्रक्रिया मूलभूतपणे बदलली आहे. विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतरच्या जनमाध्यमांमधील प्रवाह, वृत्तपत्रे, रेडिओ आणि टेलिव्हिजन प्रसारणाच्या पारंपारिक जगातून इंटरनेटकडे सरकले आहेत. या प्रवाहाच्या स्वरूपाचे पर्यायी अर्थ लावतो आणि जगभरातील सामाजिक-आर्थिक आणि राजकीय विकासाच्या प्रक्रियेवर आणि त्यांच्या परिणामांवर प्रतिबिंबित करतो.

## २.२.१ राजकीय संसूचानाचा अर्थ

आधुनिक राजकीय विश्लेषणातील राजकीय संसूचन ही एक महत्त्वाची संकल्पना आहे. राजकीय व्यवस्था सतत कार्यरत राहण्यासाठी तिच्यातील एका घटकाकडून दुसऱ्या घटकाकडे राजकीय स्वरुपाची माहिती संक्रमीत होण्याची प्रक्रिया म्हणजे राजकीय संसूचन, विज्ञापन, संज्ञापन किंवा संदेशवहन होय. संसूचन हे शब्द इंग्रजी Communication या शब्दाचा मराठी अर्थ आहे. Communication हा शब्द लॅटिन Communis या शब्दापासून तयार झाला आहे. Communis याचा अर्थ सांगणे किंवा देणे किंवा विभागणे असा आहे. Communication म्हणजे एखादी गोष्ट इतरांच्या समवेत सामुहिक करण्यासाठी तिची देवाण घेवाण करणे होय. त्यामुळे राजकीय संसूचन हे राजकीय व्यवस्थेचे एक महत्त्वाचे अंगभूत कार्य आहे. राजकीय संरचनांच्या विविध अंगांना एकत्रित आणण्याचे हे महत्त्वाचे कार्य संसूचन प्रक्रियेद्वारे साधले जाते. हया प्रक्रियेत राजकीय माहितीचा प्रवाह एका रचनेकडून दुसरीकडे असा एकमार्गी नसतो. तर राजकीय माहितीची देवाणघेवाण होत राहते. सर्व प्रकारच्या माहितीच्या देवाण-घेवाणीचा राजकीय संपर्कात समावेश होतो. आल्मंडने राजकीय संपर्काला आदान मानले आहे. कारण त्यामुळे राजकीय व्यवस्थेला रूपांतर प्रक्रियेची क्षमता वाढवणे शक्य होते. राजकीय संसूचनाच्या अभ्यासात संपर्काचे उगम माध्यमिक संपर्काचा आशय इत्यादी घटकांचा अभ्यास होतो.

नॉर्बट वायनर हा राजकीय संसुचनाचा जनक मानला जातो. राज्यशास्त्राच्या दृष्टीने कार्ल डवाईश या प्रमुख विचारवंताने राजकीय संसूचन सिद्धांत व दृष्टिकोनाचा विचार केला आहे. कार्ल ड्वाईश यांच्या मते राज्यसंस्था किंवा इतर राजकीय व्यवस्था या मुख्यत्वे करून संघटना या सदरात मोडतात. म्हणून संसूचन संदर्भात त्यांचा सर्वागामी अभ्यास आधुनिक समाज व्यवहाराच्या विशेषत: राजकीय प्रक्रियेच्या व व्याप्ती वस्तुस्थितीच्या दृष्टीने होणे पर्यायी ठरते.

**राजकीय संसूचनाची व्याख्या**

राजकीय संसूचन ही संकल्पना सापेक्ष म्हणून व्यापक आहे. अनेक अर्थाने ती वापरली जाते. यात मानवी वर्तनासंबंधीचे दृष्टिकोन तर अंतर्भूत आहेतच पण एका देशातील प्रक्रियेची दुसऱ्या देशावर होणारी प्रतिक्रिया ही यात समाविष्ट करावी लागेल.

राजकीय संसूचनाची व्याख्या अनेक विचारवंतानी केली आहे. ते खालीलप्रमाणे सांगता येईल.

रिचर्ड रोझ यांच्या मते, ‘राजकीय व्यवस्थेतील भिन्नभिन्न घटकांना जोडणारा दुवा म्हणजे राजकीय संसूचन होय.’

लुशियन पाय यांच्या मते, ‘राजकीय संसूचन म्हणजे राजकीय यंत्रणेची अशी व्यवस्था की ज्याद्वारे राजकीय मानवाचे विचार संदेश व संकेत राजकीय व्यवस्थेपर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले जाते.’

रुस व अल्थाफ यांच्या मते, ‘राजकीयदृष्ट्या सुसंगत असलेल्या माहितीचे राजकीय व्यवस्थेच्या एका भागाकडून दुसऱ्या भागाकडे संचरण करणे म्हणजे राजकीय संसूचन होय.’

कार्ल डवाईश यांच्या मते, 'राजकीय व्यवस्थेतील एक घटक दुसऱ्या घटकाला संदेश पोहोचवण्यासाठी ज्या गतिशील तत्त्वाचा वापर करतात त्याला राजकीय संसूचन असे म्हणतात.'

गणित शास्त्रज्ञ विव्हर यांच्या मते, 'एका मनाकडून इतर मनावर परिणाम करणाऱ्या सर्व घटना संसूचनात मोडतात.'

वरील सर्व व्याख्यावरून असे म्हणता येईल की, ज्या संदर्भात ही संकल्पना वापरली जाते व त्या दृष्टिकोनातून ती बघण्यात येते. त्यावरच त्याचा अर्थ अवलंबून आहे. एकूणच राजकीय व्यवस्थेला कार्यरत ठेवणारी व गतिशील बनविणारी प्रक्रिया म्हणजे राजकीय संसूचन होय.

**राजकीय संसूचानाचे स्वरूप**

संसूचन दृष्टिकोन दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात राज्यशास्त्राला शिस्तबद्ध आणि शास्त्रीय स्वरूप देण्याच्या प्रयत्नाचा भाग म्हणून निर्माण झालेला दृष्टिकोन आहे. राजकीय व्यवहार हे मुख्यतः माहितीच्या देवाण-घेवाणीवर संसूचनावर आधारित असतात. संसूचनाच्या आधारे राजकीय व्यवहाराचे स्वरूप ठरते आणि राजकीय प्रक्रियेच्या स्पष्टीकरणासाठी संसूचनाचा अभ्यास उपलब्ध ठरतो असे संसूचन दृष्टिकोन मानतो. राज्यशास्त्रात कार्ल डवाईश याने हा दृष्टिकोन विकसित केला.

राजकीय संरचनेचे स्वरूप राजकीय व्यवस्था ही अनेक उपव्यवस्थांनी मिळून बनलेली असते. राजकीय व्यवस्थेतील भूमिका आणि कार्य महत्त्वाचे असते. त्या कार्याचे स्वरूप राजकीय व्यवस्था कोणत्या प्रकारची आहे यावरही अवलंबून असते. प्रत्येक आधुनिक राजकीय व्यवस्थेत प्रत्येक काम करण्यासाठी एक स्वतंत्र संरचना अस्तित्वात असते. राजकीय व्यवस्था व्यवस्थित असेल तर सर्व काही सुरळीत पार पडत असते. म्हणून सर्व उपव्यवस्था किंवा संरचनात संयोजन असणे आवश्यक असते. कोणत्याही राजकीय व्यवस्थेतील राजकीय संसूचनाच्या स्वरूपानुसार तेथील उपव्यवस्थामध्ये समन्वय प्रस्थापित होत असतो.

राजकीय संसूचनाचे स्वरूप स्पष्ट करताना खालील मुद्द्यांचा विचार करावा लागेल.

**१) सामाजिक आंतरक्रिया:-** राजकीय संसूचन हे व्यापक दृष्टीने पाहता समाजातील अंतरक्रियेचाच एक भाग आहे. यामध्ये व्यक्ती-व्यक्तीत, व्यक्ती-समूहात व समूहा-समूहात राजकीय माहिती, ज्ञान, विचार इत्यादीची देवाण-घेवाण होत असते. त्याचबरोबर या गोष्टीचा आकलन करून घेण्यासाठी प्रयत्न केला जात असतो. या व्यक्ती व समूह हे समाजात एकत्र राहत असल्याने ते समाजाचे घटक आहेत. तसेच ते राजकीय व्यवस्थेचे भाग आणि घटक म्हणून ही देवाणघेवाणाची व राजकीय माहिती समजून घेण्याची सामाजिक आंतरक्रिया करीत असतात.

**२) विविध घटकातील संसूचन:-** राजकीय संसूचन ही विविध घटकांनी अंतर्भूत असते. रुश व अल्थाफ यांनी पाच घटक सांगितले आहेत. त्यामध्ये माहितीचा स्त्रोत, माहिती, माहितीचे माध्यम, जनता आणि प्रत्यादान पाच घटकांचा मिळून राजकीय संसुचन होत असते.

**३) संसूचनाचे वर्गीकरण:–** राजकीय संसूचन हे दोन प्रकारचे असते. त्यापैकी एक प्रकार म्हणजे समस्तरीय किंवा आडवे दुसरा प्रकार उभे किंवा विषमस्तरीय होय. समान स्थानावरील लोकात घडून येणाऱ्या संसूचनास आडवे संसूचन म्हणतात. उदाहरणार्थ समान दोन मंत्र्यांमध्ये जेव्हा वैचारिक देवाण–घेवाण किंवा चर्चा घडवून येते तेव्हा ते आडवे संसूचन असते. विषमस्तरीय किंवा उभे संसूचन म्हणजे विषम स्तरावर असणाऱ्या व्यक्ती व्यक्तीतील संसूचन होय. जेव्हा दोन घटकाचा श्रेष्ठ व कनिष्ठ स्वरूपाचा दर्जा असतो तेव्हा त्याच्याकडून घडून येणारे संसूचन हे उभे संसूचन असते. या संसूचनात एकाने दिलेला आदेश दुसऱ्याने पाळायचा असतो. त्याचबरोबर वरिष्ठ अधिकारी आपल्या कनिष्ठ अधिकाऱ्यापर्यंत ही माहिती पोहोचवण्याचे कार्य करतात. मात्र ती माहिती आदेशाच्या स्वरूपात असते व त्यानुसार कार्यवाही होते. तेव्हा राजकीय संसूचन हे उभे संसूचन असते. त्याचबरोबर राजकीय व्यवस्थेत घडून येणारे संसूचन अनेकदा औपचारिक किंवा जाणीवपूर्वक घडून आणलेले तर कधी आपोआप म्हणजे अनौपचारिक घडून येते.

**४) व्यक्ती आधारित संसूचन:–** संसुचनेमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींच्या आधारावर संसूचनाचे चार प्रकार पडतात. पहिले व्यक्ती अंतर्गत संसूचन यामध्ये एखाद्या व्यक्तीने अंतर्मुख होऊन स्वतःशीच केलेले संवाद असते. दुसरे अंतरव्यक्ती संसूचन यामध्ये दोन व्यक्तींमध्ये होणारे संवाद आंतर व्यक्ती संसूचन होय. तिसरे समूह संसूचन यामध्ये एखाद्या विशिष्ट स्थळी एका दिवसात समूहाच्या सदस्यांमध्ये होणारे संवाद म्हणजे समूह संसूचन होय.चौथे जनसंसूचन यामध्ये एखाद्या भौतिक उपकरणाद्वारे उदा. आकाशवाणी, दूरचित्रवाणी, इंटरनेट, ऑनलाईन इत्यादी माध्यमाद्वारे असंख्य व्यक्तीत होणारे संसूचन हे जनसंसूचन होय.

**५) सार्वत्रिकता:–** राजकीय संसूचन सार्वत्रिक स्वरूपाचे आहे. म्हणजे ते सर्व प्रकारच्या राजकीय व्यवस्थेत आढळते. राजकीय व्यवस्था मग ती लोकशाही प्रकारची असो, सर्वांकषवादी असो एकाधिकारशाही असो तिच्यात राजकीय व्यवस्था राजकीय संसूचनाची व्यवस्था असतेच. फक्त तिचे स्वरूप भिन्नभिन्न असते. लोकशाही व्यवस्थेत संसूचन व्यवस्था मुक्त असते. तेथे सरकारचे निर्णय जसे लोकापर्यंत जातात. तसेच लोकांच्या आशा आकांक्षा सत्ताधाऱ्यापर्यंत पोहोचत असतात. त्यामुळे तेथे संसूचन हे दुहेरी असते. त्यामुळे ते जनतेच्या दृष्टीने परिणामकारक व विश्वासावर असते. उलट सर्वांकष व एकाधिकारशाही व्यवस्थेमध्ये संसूचन हे सत्ताधाऱ्यांच्या नियंत्रणाखाली असते. त्यामुळे ते केवळ एकतर्फी संसूचधन होत असते. म्हणून सत्ताधाऱ्यांचे आदेश जनतेकडे संक्रमित प्रसारित होतात पण जनतेचे आकांक्षा सत्ताधाऱ्यापर्यंत पोहोचत नसतात म्हणजे या व्यवस्थेतील राजकीय संस्थेचे जनतेच्या दृष्टीने फारसे परिणामकारक व विश्वासार्ह नसते.

एकूणच सर्व प्रकारच्या माहितीच्या देवाणघेवाणीचा राजकीय संसूचनात समावेश होतो, जसे की – लिखित शब्द किंवा मौखिक शब्द, चिन्हे, प्रतीके, दर्शके आणि प्रतिकात्मक कृती किंवा हालचाली. राजकीय संसूचनाचे कार्य हे विशिष्ट संस्था अगर संघटनांच्या मार्फतही होत असते. राजकीय संसूचनाची अनेक साधने/मार्ग आहेत. उदाहरणार्थ, वृत्तपत्रे, वृत्तपरिषदा, आकाशवाणी, दूरचित्रवाणी, चित्रपट, नाटक, सभा, संमेलने, मिरवणुका, राजकीय पक्ष, दबावगट, व्यावसायिक व वैचारिक संघटना, विधिमंडळ व विधिमंडळ सदस्य, शासनाचा माहिती विभाग, प्रकाशन विभाग आणि जनसंपर्क विभाग तसेच राष्ट्रीय नेत्यांचे

दौरे, सार्वजनिक भाषणे, नियतकालिकांना दिलेल्या मुलाखती. या सर्व घटकांद्वारे राजकीय संसूचन सतत सुरु असते. कोणत्याही सामाजिक पर्यावरणात राजकीय संसूचन होत असते. दोन किंवा अधिक व्यक्तींनी केलेली चर्चा, निवडून दिलेल्या प्रतिनिधींवर मतदारांनी ठेवलेले लक्ष ही देखील त्यादृष्टीने राजकीय संसूचनाचीच उदाहरणे म्हणता येतील. आल्मंड या राजकीय विचारवंताने राजकीय संपर्क आदान मानले आहे. कारण त्यामुळे राजकीय व्यवस्थेला रुपांतर प्रक्रियेची क्षमता वाढविणे शक्य होते. राजकीय संपर्काच्या अभ्यासात संपर्काचे उगम, माध्यमे, संपर्काचा आशय इत्यादी घटकांचा अभ्यास होतो.

### २.२.२ राजकीय संसूचनाचा विकास

राजकीय संसूचन प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. या काळात राज्यकर्त्यांनी जनतेला शक्ती आणि अधिकार देण्यासाठी प्रतीके आणि स्मारके वापरीत होते. प्राचीन ग्रीसमध्ये, अथेन्समध्ये पेरिकल्सने दिलेली सार्वजनिक भाषणे हे राजकीय संसूचन म्हणून कार्य करीत होते. ही भाषणे युद्धाच्या काळात जनतेचा पाठिंबा मिळविण्यात महत्त्वाची भूमिका बजावत होती. रोमन साम्राज्याच्या काळात राजकीय संसूचनाचे काम हे प्रचार, वक्तृत्व आणि सार्वजनिक भाषणे इत्यादी साधनाचा वापर करून अधिक चांगले संवाद केले जात जेणेकरून जनमतावर प्रभाव पाडता येईल. त्यांच्या राजकीय संवाद कौशल्यासाठी प्रसिद्ध असलेल्या व्यक्तींमध्ये सिसेरोचा समावेश आहे.

भारतामध्ये गौतम बुद्ध व महावीर यांनी गावोगाव फिरून प्रवचने देत असत. तसेच सम्राट अशोक याने आपल्या राज्यात दौरे करून लोकांच्या भावना समजून घेत असत. तसेच शिलालेख निर्माण करून आपले निर्णय, व ज्याची माहिती देत असत. शिवाजी महाराजांच्या काळात खलिते पाठवून आपले निर्णय लोकांपर्यंत पोहचवत असे. तसेच पोवाडे, सांस्कृतिक कार्यक्रम, इत्यादीच्या सहाय्याने लोकांना आपले निर्णय कळवीत असत. भक्ती संप्रदाय, वारकरी संप्रदाय, महानुभाव मठ, स्वामींचे वेगवेगळे मठ, शंकराचार्य इत्यादी लोक हे जनतेशी संवाद साधत असत. त्यातून सांस्कृतिक व सामाजिक गोष्टींची देवाण घेवाण होत असे. त्याच बरोबर राजकीय प्रबोधन ही होत असे.

आधुनिक काळामध्ये औद्योगिक विकास झाला. ब्रिटनमध्ये आधुनिक प्रिंटिंग प्रेसचा उदय झाला. त्यामुळे संवादाचे मार्ग सुरु झाले. प्रिंट मीडियाच्या निर्मितीनंतर २० व्या शतकात आधुनिक मास मीडिया तयार करण्याची क्षमता निर्माण झाली, ज्यामुळे राजकीय संवादाचे रूपांतर झाले, ज्यामुळे प्रचार, जाहिराती आणि जनसंपर्क यांचे नवीन प्रकार निर्माण झाले. विन्स्टन चर्चिल आणि फ्रँकलिन सारख्या राजकीय नेत्यांनी संकट आणि युद्धाच्या काळात लाखो श्रोत्यांपर्यंत पोहोचण्यासाठी रेडिओ प्रसारणांचा वापर केला. एडवर्ड एस. हरमन यांनी नमूद केले आहे की प्रिंटिंग प्रेसच्या महागड्या स्वरूपामुळे तंत्रज्ञानाच्या अस्तित्वाच्या सुरुवातीच्या काळात, भांडवलाच्या अडचणींमुळे कामगार आणि सहकारी संस्थांना प्रेस मीडिया मार्केटमधून सहजपणे बाहेर काढता येत असे, म्हणजेच कॉर्पोरेशन्सना बाजारपेठेवर लवकर पकड मिळाली. म्हणून हरमन यांचा असा युक्तिवाद आहे की याचा अर्थ ब्रिटनच्या मास मीडियामध्ये सुरुवातीला, कॉर्पोरेट उजव्या

विचारसरणीचे आवाज त्यांचे वृत्तपत्रे चालवण्यासाठी संपादकांची स्वतः निवड करायचे, संघटित कामगार वर्ग आणि डाव्या विचारसरणीचे आवाजांना मास मीडिया मार्केटमध्ये सहभागी होण्यापासून रोखायचे.

१९९० आणि २००० च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात राजकीय संवादाचा एक प्रकार म्हणून राजकीय फिरकी सामान्य झाली होती, या राजकीय संवादकांना स्पिन डॉक्टर म्हणून ओळखले जात असे. उदाहरणार्थ, युनायटेड किंग्डममधील टोनी ब्लेअर आणि जॉर्ज डब्ल्यू. बुश सारख्या सरकारांना यासाठी ओळखले जात असे. टोनी ब्लेअरचे प्रेस सेक्रेटरी ॲ लिस्टर कॅम्पबेल, जे पूर्वी पत्रकार होते, यांना ब्रिटिश मीडियासोबत प्रेस ब्रीफिंग वापरून ब्रिटिश सरकारला वाईट प्रकाशात दाखवणाऱ्या वाईट परिस्थितींना फिरवण्याचे काम होते. कॅम्पबेल हे युनायटेड किंग्डममधील टोनी ब्लेअरच्या लेबर सरकारच्या राजकीय संवाद साधनात एक प्रभावशाली आणि वादग्रस्त भर बनले. युनायटेड किंग्डम आणि युनायटेड स्टेट्स सारख्या पाश्चात्य देशांमधील नंतरच्या सरकारांमध्ये ही पद्धत मानक बनली, समर्पित 'ब्रिफिंग रूम' सह ज्याद्वारे सरकारी सदस्य देशांच्या पत्रकारांशी संवाद साधतात आणि संवाद साधतात, ज्यांना स्पिन रूम म्हणून ओळखले जाऊ लागले आहे.

आज, डिजिटल युगात माध्यमांच्या विविधतेमुळे, राजकीय संवादात आता सोशल मीडियासारखे ऑनलाइन प्लॅटफॉर्म, यु ट्यूब, ट्विटर, मेटा प्लॅटफॉर्म आणि ऑनलाइन न्यूज वेबसाइट्स सारख्या सेवांवरील मोफत ऑनलाइन न्यूज चॅनेल देखील समाविष्ट आहेत. यामुळे जनता आणि मतदार त्यांच्या राजकीय बातम्या आणि माहिती कशी प्राप्त करतात हे बदलले आहे. उदाहरणार्थ, २००८ आणि २०१२ मधील बराक ओबामा यांच्या अध्यक्षीय मोहिमा समर्थकांना एकत्रित करण्यासाठी उल्लेखनीय आहेत, कारण त्यांनी मतदारांना गुंतवून ठेवण्यासाठी आणि निधी उभारण्यासाठी सोशल मीडियाचा वापर नवीन करण्यास मदत केली. युक्रेनमध्ये वाल्होमीर झेलेन्स्कीच्या २०१९ च्या यशस्वी अध्यक्षीय मोहिमेतही सोशल मीडिया पोस्टचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आला होता.

आज, राजकीय संवाद वेगाने विकसित होत आहे, कारण एआय आणि बिग डेटा ॲनालिटिक्स सारख्या नवीन तंत्रज्ञानामुळे मतदारांना लक्ष्य करण्यासाठी आणि त्यांचे मन वळवण्यासाठी मोहिमा कशा आकार घेऊ शकतात हे पुन्हा आकार घेऊ लागले आहे. तथापि, यामुळे चुकीची माहिती, इको चेंबर्स आणि ऑनलाइन ध्रुवीकरणाबाबत मोठ्या चिंता निर्माण झाल्या आहेत. फेसबुक-केंब्रिज ॲनालिटिका घोटाळ्यासारख्या अलीकडील निवडणूक हाताळणीच्या घटना आता एक समस्या बनल्या आहेत. वापरकर्त्यांचा फेसबुक डेटा अनैतिकपणे वापरून कंपनीने डोनाल्ड ट्रम्प यांच्या निवडणूक मोहिमेला मदत केल्याचे आढळून आले, ज्यामुळे जनतेमध्ये कॉर्पोरेट आणि राजकीय संस्थांवरील अविश्वासाची पातळी वाढली आहे. त्यामुळे आजच्या काळात व्हाटस अप, ट्विटर, फेसबुक, इंस्टाग्राम इत्यादी सोशिल मेडिया चा वापर मोठ्याप्रमाणात सर्वच राजकीय पक्ष करीत आहेत.

### २.२.३ राजकीय संसूचनाचे प्रकार

कोणत्याही राजकीय व्यवस्थेत संसूचन हे वैचारिकतेवर अवलंबून असते. वैचारिक विनिमयाशिवाय राजकीय कार्य पार पडत नसतात. राजकीय प्रक्रियेत विविध राजकीय पक्ष, दबाव गट, हितसंबंधी गट,

राज्यकर्ता, पक्ष आणि विरोधी पक्ष यासारख्या घटकाद्वारे सातत्याने वैचारिक देवाण घेऊन होत असते. ही वैचारिक देवाण घेवाण अनेक प्रकारच्या माध्यमाद्वारे पार पडत असते. वर्तमानपत्रे, मासिके, रेडीओ व दूरदर्शन यासारखी साधने संसूचानाचे माध्यम म्हणून लोकांना परिचित आहेत. मात्र त्यांचा राजकीय मतनिर्मितीवर फारसा प्रभाव पडतोच असे नाही. याशिवाय अन्य प्रकारच्या माध्यमातून सुद्धा राजकीय संसूचन घडून येत असते म्हणजे विकसित व विकसनशील देशातील संसूचन माध्यमांचे ज्या प्रकारात वर्गीकरण केले जाते त्याचा तपशील पुढील प्रमाणे सांगता येईल.

**१) अनौपचारिक प्रत्यक्ष संपर्क:–** अनौपचारिक प्रत्यक्ष संसूचन हे व्यक्तिगत पातळीवर कायमचे अस्तित्वात असते. अन्य कोणत्याही लोक माध्यमापेक्षा अनौपचारिक पातळीवरचा संपर्क महत्त्वाचा मानला जातो. या प्रत्यक्ष संपर्कामुळे संसूचनाचे कार्य अत्यंत प्रभावी बनत असते. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, जपान यासारख्या राष्ट्रातील समाजात रेडीओ, दूरदर्शन आणि वर्तमानपत्रापेक्षा अनौपचारिक प्रत्यक्ष संपर्काचा लोकावर जास्त प्रभाव पडत असतो. हे अनेक अभ्यासकांचे मत आहे. लोक आपल्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी अनेकदा एकत्र येतात तसेच लोक आपापसात चर्चा करून निर्णय घेत असतात. तज्ञांच्या सल्लयाची ते वाट पाहत नाहीत किंवा प्रत्येक वेळेस त्यांना आपल्या समस्या सोडविताना योग्य मार्गदर्शन मिळतेच असे नाही. अशावेळी अनेक प्रसंगी ते प्रत्यक्ष संपर्काचा आधार घेत असतात त्यामुळे अनौपचारिक प्रत्यक्ष संपर्क हे एक संसूचनाचे माध्यम महत्वाचे ठरते. तथापि आज अनेक विविध प्रकारची संसूचनांची प्रभावी माध्यमे काम करीत असली तरी अनौपचारिक प्रत्यक्ष संपर्काचा माध्यम महत्वाचा राहिला आहे व पुढेही टिकून राहणार आहे.

**२) पारंपारिक सामाजिक संरचना:–** पारंपरिक सामाजिक संरचना या राजकीय संसूचनेत कुटुंब, जात, धर्म, नातेसंबंध, कुळ, जमात, भाषा,यासारख्या घटकांचा समावेश होत असतो. त्यांना परंपरागत सामाजिक संरचना म्हणतात. या संरचना देखील राजकीय संसूचनाचे काम करीत असतात. कुटुंबप्रमुख, कुलप्रमुख, नात्यागोत्यातील वृद्ध व्यक्ती, जातीचा व जमातीचा प्रमुख, धर्मगुरू इत्यादी मंडळींचा आपापल्या समूहाच्या सदस्यावर प्रभाव असतो. त्यांचा हा प्रभाव समूहाच्या सदस्यांच्य राजकीय वर्तनावरही पडत असतो. त्यामुळे राजकीय पक्ष, नेते हे अशा समाजाच्या प्रमुखामार्फत राजकीय माहिती, मते, संदेश, विचार इत्यादी इतर सदस्यापर्यंत पोहोचवीत असतात. कुटुंब हे राजकीय सामाजिकरणाबरोबरच संसूचनाचे काम करीत असते. वर्तमानपत्रे, दूरदर्शन, रेडिओ, सभा यासारख्या माध्यमाचा राजकीय पक्ष वापर करीत असले तरी कुटुंबप्रमुख, वयोवृद्ध मंडळी, जमात प्रमुख, धार्मिक जातीचे पुढारपण करणारे कार्यकर्ते इत्यादी लोकांशी राजकीय पक्षांना संपर्क ठेवावा लागतो. पक्षाचे व व्यक्तीचे महत्त्व निर्माण करण्यासाठी राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांना आवश्यक असतो.

**३) राजकीय आदान संरचना:–** हितसंबधी गट, दबाव गट, संघटना राजकीय पक्ष इत्यादींचा समावेश राजकीय आदान प्रक्रियेत होतो. कारण जनतेच्या मागण्या, अपेक्षा प्रश्न इत्यादी राजकीय व्यवस्थेपर्यंत पोहचवण्याचे काम या संरचना करतात. भारतासारख्या देशात आदान संरचना धोरण विषयक निर्णय घेण्यासाठी प्रथम लोकांच्या मागण्याच्या अविष्करण व एकत्रीकरण होणे आवश्यक असते. यासाठी

कुटुंबासारख्या अन्य घटकांचा फार मोठा मोलाचा वाटा गृहीत असतो.कारण प्रत्येक राजकीय व्यवस्थेत ही कार्ये कोणत्याही प्रकारच्या संरचना किंवा घटक करीत असतात. म्हणूनच प्राचीन काळात धर्मगुरू किंवा जमातीचा नेता लोकांच्या तक्रारी राजाच्या कानावर टाकत असे. त्यामुळे या मागण्यांचा विचार करून त्या विषयाचे निर्णय घेणे, धोरण ठरविणे, नियम करणे इत्यादी कार्य राजकीय व्यवस्थेला करणे सोपे जाते. आज हितसंबंधी गट व राजकीय पक्ष संरचना जनता व शासन यांच्यामध्ये महत्त्वपूर्ण दुवा म्हणून कार्य करीत आहेत. अशा या आधुनिक संरचनामुळे पारंपरिक संरचनांचे संसूचनाच्या दृष्टीने असलेले महत्त्व कमी झालेले आहे. असे असले तरी काही पारंपारिक संरचना, आधुनिक संरचनात रूपांतरित झाल्याचेही आढळते. आधुनिक काळातही माध्यमे संसूचनाच्या दृष्टीने खूपच महत्त्वाची समजली जातात. कारण त्यांच्या धोरणातून व उद्दिष्टातून समाजातील विविध हितसंबंधाचे स्वरूप स्पष्ट होत असते. उदा. विद्यार्थी, कामगार यांच्या मागण्या त्यांच्या गटाद्वारे केंद्रापर्यंत पोहोचवले जातात व त्यानंतर परस्पर विचारविनिमयातून मागण्याची पूर्तता होत असते. म्हणजे या माध्यमातून सत्तेला लोकांच्या अडीअडचणीचे स्वरूप समजतअसते.

**४) राजकीय प्रदान संरचना:–** कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्याय मंडळ, नोकरशाही इत्यादींना राजकीय प्रदान संरचना म्हणतात. या संरचना देखील राजकीय व्यवस्था व जनता यांच्यात संसूचनाचे काम करीत असतात. कायदेमंडळाचे सदस्य जनतेचे प्रतिनिधी असतात व ते शासन व जनता यांच्यात संपर्क प्रस्थापित करीत असतात. जनतेच्या प्रश्नावर चर्चा होत असते व या चर्चेद्वारे विविध प्रकारची राजकीय माहिती जनतेपर्यंत पोहोचत असते कायदेमंडळ हे कार्यकारी मंडळ व जनता यांच्यातील दुवा म्हणून ही कार्य करते. कार्यकारी मंडळांनी घेतलेल्या निर्णयाची माहिती प्रथम कायदेमंडळाला होत असते. त्या माहितीच्या आधारे कायदेमंडळ हे कार्यकारी मंडळास काही आदेश व सूचना देत असते. कायदेमंडळाच्या विविध समित्या असतात व त्या एखाद्या विधेयकावर विचार करताना विधेयकाचे संबंधित असणाऱ्या गटाबरोबर चर्चा विचार विनिमय करीत असतात. ही चर्चा राजकीय संसूचनाची असते. अशा प्रकारे कायदेमंडळ संरचनेचे कार्य करते. जनतेच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी हे विधिमंडळाचे सभासद तथा जनतेचे प्रतिनिधी आटोकाट प्रयत्न करत असतात. सभासदांची निवेदने ऐकून घेतली जातात. त्यावर चर्चा घडवून आणली जाते. मग निर्णय घेतले जातात. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न केले जातात. अर्थात विधिमंडळात घेतलेल्या निर्णयाच्या आदेश कार्यकारी मंडळाला दिल्या जातात. त्यामुळे कार्यकारी मंडळ आणि जनता यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून विधिमंडळ महत्वाची भूमिका बजावीत असते.

निर्णयाची अंमलबजावणी सनदी नोकरावर अवलंबून असते. त्यामुळे नोकरशाही देखील राजकीय संरचनेचे काम करीत असते. कायदेमंडळाचे सदस्य विधेयक धोरण बनवताना नोकरशाहीकडून हवी ती माहिती मिळवत असतात. तसेच कायद्याची व धोरणाची अंमलबजावणी करताना नोकरशाही जनतेशी संपर्क ठेवीत असते. त्यासाठी विविध व्यक्ती, समूह, संघटना इत्यादीचे सहकार्य घेत असते. शासकीय धोरणाची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी नोकरशाहीला माहित असते. त्यामुळे धोरण ठरविण्याच्या कामात नोकरशाही कायदेमंडळ व मंत्रिमंडळ सदस्यांना योग्य ती माहिती व तांत्रिक सल्ला व सहकार्य देत असते.

विधिमंडळ आणि कार्यकारी मंडळ व नोकरशाही प्रमाणेच न्यायदान मंडळेसुद्धा संसूचनाचे काम करत असतात. शासकीय व्यवस्थेत आणि अडचणी निर्माण होत असतात. त्यातून संबंधित व्यवस्थात संघर्ष निर्माण होत असतो. हे संघर्ष मिटवण्यासाठी न्यायमंडळे तयार असतात. म्हणजे न्यायमंडळेसुद्धा संसूचनाचे कार्य करीत करतात. विधिमंडळे, सनदी नोकरवर्ग आणि न्यायमंडळे हे प्रदान किंवा शासकीय संरचनांचे घटक म्हणून राजकीय संसूचनाचे कार्य करीत असतात. या घटकावरच शासनव्यवस्थेचा कारभार अवलंबून असतो. म्हणून कोणत्याही व्यवस्था प्रकारात या तीन घटकात परस्परांशी निकोप संबंध असणे आवश्यक आहे.

**५) जनता संसूचन माध्यमे:–** वृत्तपत्रे, नियतकालिके, ग्रंथ, रेडिओ, दूरचित्रवाणी, इंटरनेट इत्यादी साधनांना जनसंपर्क संसूचन माध्यमे म्हणतात. ही माध्यमे अत्यंत जलद गतीने, कमी वेळेत, व्यवस्थेच्या कानाकोपऱ्यात राजकीय माहितीचे, मतांचे, कल्पनांचे प्रसारण करीत असतात. या माध्यमांची जनसंपर्क प्रस्थापित करण्याची क्षमता प्रचंड व्यापक असल्याने सर्वच देशात शासनासह बिगर शासकीय संघटना ही संसूचनासाठी त्याचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहेत. आधुनिक काळात या माध्यमांना कमालीचे महत्त्व प्राप्त झाले आहे. कारण वेळ कमी, खर्च कमी आणि कमीत कमी विकृत स्वरूपात जवळपास सर्व लोकांपर्यंत माहिती प्रसारित करण्याची क्षमता असलेली ही माध्यमे, जगातील प्रत्येक माणसाला जवळची वाटू लागली आहेत. ही माध्यमे इतर सर्व प्रकारच्या संसूचन माध्यमापेक्षा अधिक प्रभावित करणारी माध्यमे आहेत. ही माध्यमे संसूचनाचे कार्य करतात वर्तमानपत्रे वगळता इतर सर्व माध्यमे निरक्षर माणसाला जवळची वाटू लागतात. रेडिओ. दूरध्वनी. चित्रपट यासारखी संसूचन माध्यमे अशिक्षित असलेल्यांना सुद्धा समजून येत. ही सर्व माध्यमे हाताशी असल्यामुळे राजकीय अभिजनांचा जनता संपर्क वाढला आहे. वर्तमान काळात या माध्यमातून राजकीय प्रक्रिया गतिमान झाले आहेत.जनसंपर्क करण्यासाठी ही माध्यमे सरकारी नोकरवर्गांना सुद्धा उपयुक्त ठरत आहेत.

## २.२.४ कार्ल ड्वाईश – राजकीय संसूचनाचा सिद्धांत

माहिती नियंत्रण शास्त्र (Cybernetics) व संसूचन सिध्दातांच्या आधारे कार्ल ड्वाईशने आपल्या "The Nerves of Government' या ग्रंथामध्ये राजकीय संसूचनाचा दृष्टीकोन मांडला. विशिष्ट उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी मानवी प्रयत्नांना चालना देणे आणि त्यांचा समन्वय साधणे ही राजकारणातील आणि प्रशासनातील मूलभूत प्रक्रिया आहे अशी संसूचन दृष्टीकोनाची आधारभूत भूमिका आहे. त्याच्या मते, संसूचन हे राजकीय व्यवहारांचे एक गतिशील तत्व आहे की ज्याव्दारे राजकीय व्यवस्थेतील एक घटक दुसऱ्या घटकाला संदेश पोहोचवितो. विविध वार्ताप्रवाहांवर आधारलेली निर्णय प्रक्रियेची व्यवस्था म्हणजे शासन होय असे ही प्रतिपादन ड्वाईशने केले आहे. संसूचनाव्दारे राजकीय व्यवस्था आपल्या ध्येय-धोरण आणि कार्यक्रमांची माहिती लोकांना देते. संसूचनाच्या माध्यमातूनच राजकीय निर्णय घेणारे केंद्र आणि विविध प्रकारच्या संस्था आणि गट यांच्यामध्ये सांमजस्य निर्माण होते.

कार्ल ड्वाईश यांचे राजकीय संसूचन दृष्टिकोना संदर्भातील काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

**१) समाज हे एक यंत्र–** राजकीय व्यवस्था ही एक सामाजिक व्यवस्थेचा एक भाग म्हणून अस्तित्वात येते आणि समाज व्यवस्थेच्या विकासाबरोबर त्याचाही विकास होतो. कारण दोघांच्यातही कार्यपद्धतीच्या अशा यंत्रणा काम करतात की ज्याच्यामुळे संसूचन प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी लोकांना मुभा आणि मार्गदर्शन मिळते. संसूचनाची यंत्रणा अशी कार्य करते माहिती मिळवली जाते, जमलेल्या माहितीची निवड, वर्गवारी आणि संचय केला जातो आणि गाठी असलेल्या पूर्वीच्या माहितीच्या अनुभवावर ताज्या व नवीन माहितीचा उपयोग कसा करायचा याचे निकष ठरवले जातात. कारण ड्वाईश यांच्या मते राजकीय सत्तेचा मूल स्त्रोतच संसूचन आहे. त्यामुळे समाजातील संसूचनाच्या उपलब्ध सोयी सवलतीवर राजकीय सत्तेचे अस्तित्व नेहमीच अवलंबून असते. म्हणून संसूचन व्यवस्थेची कार्यक्षमता अत्यावश्यक असते. ती तशी नसेल तर एकूण व्यवस्थाच कोलमडून पडेल.

**२) राज्यशास्त्राची नवी व्याख्या:–** सत्ता हाच राजकीय प्रक्रिया घडवून आणणारा प्रमुख घटक आहे. परंतु ड्वाईश यांनी याचे महत्त्व कमी करून सामाजिक उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी शासन संस्था बांधील आहे. यावरच त्याचा भर आहे. सर्व समाजासंबंधीचे निर्णय ती घेत असते आणि कार्यवाहीच्या दृष्टीने ते समाजाला बंधनकारक असतात. ड्वाईश यांच्या मते राजकीय व्यवस्थेचा गाभा म्हणजे ज्या क्षेत्रात निर्णयाची कार्यवाही केली जाते असेच क्षेत्र आणि राजकीय व्यवस्थेचे मर्म म्हणजे सामाजिक उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी मानवी प्रयत्नांना चालना देणे व त्यांचा समन्वय साधणे. ड्वाईशने सत्तेपेक्षा राजकीय व्यवहाराचे नियंत्रण किंवा सूत्रसंचालन करणे हेच राज्यसंस्थेचे प्रमुख कार्य म्हणून आपल्यापुढे ठेवले आहे.

**३) शासन संस्थेच्या संकल्पनेचा नवा अन्वयार्थ:–** राजकीय व्यवस्थेचे प्रमुख अंगभूत कर्तव्य हे आपल्या व्यक्तीवर सत्ता चालवणे नसून व्यवस्थेतील आदान प्रदान रुपी सर्व माहिती प्रक्रियेचे नियंत्रण करणे हेच आहे. वास्तविक पाहता, समाज नियंत्रणामध्ये आदान प्रदानातून होणारे माहितीचे वितरण किंवा संक्रमण अंतर्भूत असतेच आणि ही नियंत्रण प्रक्रिया समजून घेण्यासाठी संसूचन तंत्र व यंत्रणा याचेच ज्ञान आवश्यक आहे. सत्ता तंत्राचे नाही. थॉमस ग्रीन यांच्या मते लोकांच्या मनात स्वातंत्र्याची भावना रुजलेली असते. या स्वातंत्र्यात त्याचे हक्क अंतर्भूत असतात आणि या हक्कामधूनच राज्याची निर्मिती होते. थोडक्यात राज्यसंस्था म्हणजे लोक इच्छेचा आविष्कार होय. याप्रमाणेच ड्वाईश यांचा शासन संस्थेचा नवा अनुयायार्थ पुढीलप्रमाणे मांडता येईल. राजकीय व्यवस्थेतच सत्ता संकल्पना समाविष्ट आहे आणि सत्ता म्हटले की नियंत्रण आलेच ते संसूचन संबंधीचे असते आणि संसूचन प्रक्रियेमधूनच लोकच्छेचे आविष्कार होऊन निर्णय रूपाने तिची पूर्तता होते. ही वस्तुस्थिती लक्षात घेतल्यावर राजकीय व्यवस्थेने सत्तेचा वापर करण्यापेक्षा माहिती नियंत्रण करणे कसे आवश्यक आहे हे कळू शकेल. थोडक्यात ड्वाईश म्हणतात राजकीय व्यवस्था म्हणजे जहाज तर शासन हे त्याचे सुकाणू होय.

**४) सूक्ष्मलक्षी संसूचन व्यवस्था:–** राजकीय व्यवस्था अंतर्गत संरचना विविध राजकीय पक्ष व हितसंबंधी गट यांनी बनलेली असते. हे सर्व घटक परस्परावलंबी असूनही त्यांच्यातील देवाणघेवाण खुल्या स्वरूपाची असते. याशिवाय राजकीय व्यवस्थेची एक उपव्यवस्था म्हणजेच सूक्ष्मलक्षी क्षेत्र म्हणून त्यापैकी

प्रत्येक घटक आपापल्या क्षेत्रात स्वतःला परिस्थितीविषयक गरजांचे मार्गदर्शन करून घेऊन, तिच्याशी आपले कार्य रचना आणि वर्तन जुळवूनही घेऊ शकतात आणि त्यात परिवर्तन करू शकतात. असे असले तरी एकूण व्यवस्थेशी जेव्हा जेव्हा संघर्ष होण्याचा प्रसंग स्वाभाविकत: उद्भवतात. त्याची कारण आपसातील उद्दिष्टविषयीची स्पर्धा हे नसून संसूचन कार्यातील उणीवामुळे निर्माण होणारे झगडे हे होय.या उणीवा म्हणजे मार्गदर्शक साधनाच्या सोयी सवलतीची उपलब्धता करून घेण्यातील किंवा व्यवस्थेच्या संदेश, वाहक इशाऱ्याची दखल घेण्यातील अपयश आहे.

**५) समतोल संकल्पना:–** स्थिरता प्रधान राजकीय व्यवस्थेचे प्रारूप ड्वाईश मान्य करत नाही. कारण त्याच्या दृष्टीने राजकीय व्यवस्था ही गतिमानच असते आणि म्हणूनच संतुलनाला बाजूला सारून ते गतिशिलतेला प्राधान्य देतात. वास्तव परिस्थितीची दखल घेणारी आणि यंत्रवत कार्य करणारे म्हणून ते संतुलन संकल्पनाकडे बघतात. ती बदलत्या काळाबरोबर चालत आणि बदलत्या परिस्थितीत नियंत्रण करू शकत नाहीत. तेव्हा राजकीय व्यवहाराचे स्वरूप बदलते असल्यामुळे ड्वाईश हे गतिमानतेच्या बाजूने उभे राहतात आणि गतिमान परिस्थितीचा उल्लेख ते समतोल या संकल्पनेने करतात. जैविक किंवा सेंद्रिय प्राण्यांच्या शरीर रचनेत बदलत्या वातावरणाशी जुळवून घेण्याची नैसर्गिक यंत्रणात दिसून येते. हाच आधार ड्वाईश यांच्या या संकल्पनेत आढळतो. या प्राण्याप्रमाणेच राजकीय व्यवस्थेने गतिशील राहून बदलत्या परिस्थितीशी जुळवून घ्यायलाच हवे. नाहीतर तो कायच करू शकणार नाही त्याचे अस्तित्वात धोक्यात येईल.

**६) प्रत्यादान प्रक्रिया:–** आपल्या प्रत्यादान संकल्पना सकारात्मक प्रत्यादानापेक्षा नकारात्मक प्रत्यादानावर विशेष भर दिला आहे. व्यवस्थेने घेतलेल्या निर्णयावरील जनतेशी प्रतिक्रिया प्रत्येक जणांच्या आदान रूपाने परत व्यवस्थेकडे येते आणि जनतेची त्या संदर्भात व्यवस्थेला आपल्या उद्दिष्टामध्ये वर्तनातही बदल करावा लागतो. अशा प्रक्रियेला नकारात्मक प्रत्यादान असे म्हणतात. प्रत्यादान प्रक्रियेचे दोन प्रकार आहेत एक म्हणजे सकारात्मक आणि दुसरं म्हणजे नकारात्मक होय. प्रदानासंबंधीच्या प्रतिक्रिया परिस्थितीकडून व्यवस्थेकडे येतात. मात्र त्यासंबंधी व्यवस्था फारशी दखल घेत नाही. निर्णयामध्ये केवळ थोडासा बदल किंवा किरकोळ दुरुस्ती केली जाते. अशा सर्व प्रतिक्रियांचा समावेश सकारात्मक प्रत्यादानांमध्ये केला जातो. जेव्हा व्यवस्थेकडून घेतलेल्या निर्णयांचे व त्यांच्या कार्यवाहीचे परिणाम परिस्थितीच्या प्रतिक्रियात निर्माण होऊन व्यवस्थेला आपल्या वर्तनात बदल करावा लागतो व यातून उद्दिष्टे प्राप्त करण्याची दिशा प्राप्त होते तिला नकारात्मक प्रत्यादान असे म्हणतात. ही संकल्पना अधिक स्पष्ट करण्यासाठी ड्वाईश यांनी ज्या इतर संकल्पनांचा वापर केला आहे. त्यामध्ये भार, शैथिल्यजन्य गतिरोध, फलित आणि मार्गदर्शन  हे होय.

भार म्हणजे संसूचन मार्गाच्या प्रत्यादान प्रक्रियेमध्ये समाविष्ट होणाऱ्या माहितीचे संख्यात्मक प्रमाण होय.

भारक्षमता म्हणजे माहितीचा प्रवाह वाहून नेण्यासाठी आणि संचय करण्याची व्यवस्थेची क्षमता म्हणजे भारक्षमता होय.

शैथिल्यजन्य गतिरोध म्हणजे निर्णयाचे परिणाम आणि मिळवलेल्या माहितीच्या आधारे केलेले कृती यात झालेला विलंब म्हणजे शैथिल्यजन्य गतिरोधक होय. आदानाच्या स्वरूपात आलेल्या मागण्यांचे प्रदानात रूपांतर केल्यानंतर राजकीय वातावरणातून ज्या प्रतिक्रिया उमटतात त्या प्रत्यादानाच्या स्वरूपात असतात. प्रत्यादानाचे जे परिणाम आहेत त्यासंबंधी व्यवस्थेकडे येणारी माहिती प्रमाणापेक्षा कमी गतीने येत असेल तर त्याला गतिरोध म्हणतात. हा गतिरोध निर्माण होण्यासाठी अनेक कारणे असू शकतात. त्यातील प्रमुख कारण म्हणजे १) ही माहिती योग्य गतीने न येणे २) माहिती अधिक वेगाने येणे परंतु संसूचन जे मार्ग आहेत ते त्या प्रमाणात करण्यास समर्थ नसणे ३) माहितीचे विश्लेषण होऊन त्यातील आशय स्वीकृती न होणे. ४) अशा माहितीला अपेक्षित तो प्रतिसाद देण्यास व्यवस्थेच्या वेगवेगळ्या घटकांची क्षमता कमी पडणे. याशिवाय इतरही काही कारणे असू शकतील.

फलित व्यवस्थेकडे जमा झालेल्या माहितीला तिने दिलेला प्रतिसाद म्हणजे फलित होय. परिस्थितीकडून होणाऱ्या प्रतिक्रियावर व्यवस्थेतर्फे किती परिणामकारकरीतीने प्रतिसाद दिला जातो त्यावर फलित अवलंबून असते.

मार्गदर्शन राजकीय व्यवस्थेकडून घेतल्या जाणाऱ्यानिर्णयांचे काय परिणाम होतील हे लक्षात घेऊन त्यानुसार वागण्याची क्षमता म्हणजे मार्गदर्शन होय. संसूचनातून अपेक्षित असलेल्या माहितीचे योग्य संसूचन होण्यासाठी परिस्थितीसापेक्ष परिणामांची जाणीव निर्णयकर्त्यांकडे असावी लागते व ती निर्माण होण्यासाठी व्यवस्थेचे नेतृत्व योग्य असणे आवश्यक असते.

## २.२.५ राजकीय संसूचनाची साधने

**१) वृत्तपत्रे व त्यातील अग्रलेख:–** वृत्तपत्रे ही आजच्या प्रगत देशांमध्ये राजकीय संसूचनाचे महत्त्वाचे साधन आहे. हे माहिती व्यवस्थेकडे पोहोचवण्यासाठी व व्यवस्थेची माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी हे माध्यम वापरले जाते. त्यामध्ये दैनिके, साप्ताहिके आणि विशेषांक याचा समावेश होतो. अनेक वृतपत्रे सुरू झाले आहेत. कारण छपाईची नवीन कला व तंत्र यामुळे वेगाने याचा प्रसार होत असल्याचे दिसून येते. औद्योगिक क्रांतीनंतर याला अधिक वेग आला आहे.

वृत्तपत्रातील बातम्या बरोबरच अग्रलेख ही लिहिले जातात. अग्रलेखांमधून प्रत्येक विविध विषयावर मते व्यक्त केली जातात. त्यातून वृत्तपत्रावर कोणत्या राजकीय तत्त्वज्ञानाचा प्रभाव आहे हे जाणून घेण्यास मदत होत असते. तसेच सरकारने घेतलेल्या निर्णयाची चिकित्सा त्या अग्रलेखात केलेली असते. त्याच बरोबर विरोधकांनी घेतलेल्या भूमिकेची शहनिशा केली जाते. त्यातून शासनाच्या धोरणाचे टीकात्मक मूल्यमापन केले जाते. अशा परिस्थितीमधून पुढेच काय घडणार आहे यावर भाष्य केले जाते. त्यामुळे संसूचनांमधील खरी माहिती स्वीकारण्यास शासकाला मदत होते.

**२) रेडिओ:–** रेडिओ हे संसूचन होण्यासाठी महत्वाचे साधन आहे. शासनाचे महत्त्वाचे निर्णय हे बातमी रूपाने लोकापर्यंत पोहचवले जातात. त्यावरील लोकांच्या परिस्थितीमधून घडणाऱ्या प्रतिक्रिया याचे प्रसारण

नेहमी होत असते. तसेच विधिमंडळाचे समालोचन, धोरणात्मक बाबीचे प्रसारण याद्वारे संसूचनांची कार्य केले जाते.

**३) दूरचित्रवाणी:–** हे आधुनिक संसूचनाचे प्रभावी माध्यम म्हणून ओळखले जाते. आज जगभर त्याचा वापर संसूचनाचे माध्यम म्हणून केला जातो. विशेषतः शासनाचे धोरण, निर्णय, नेतृत्वाची क्षमता याची जाणीव त्यामधून होत असते. आज भारतासारख्या विकसनशील देशात संसदेच्या कामकाजाचे प्रसारण करून शासनाचे धोरण व त्यावरील जनप्रतिनिधींचे समाधान व विरोध याचे प्रत्यक्ष दर्शन जनमानसाला होते. संसूचनांच्या प्रक्रियेतून शासनाला आपल्या व्यवस्थेला स्थैर्य प्राप्त करून देण्यात मदत होत असते. तसेच जनमानसाच्या निर्णयाप्रती होणाऱ्या प्रतिक्रिया शासनापर्यंत पोहोचवण्यास मदत होते.

**४) व्यंगचित्रे आणि छायाचित्रे:–** कधी अग्रलेख किंवा बातमीद्वारे जी गोष्ट सांगितली जाते. ती गोष्ट व्यंगचित्र व छायाचित्रांनीसांगून आपले उद्देश साध्य केले जाते. कारण त्याची  परिणामकारकताअधिक असते. म्हणून सभेला हजर असणाऱ्या लोकांपेक्षा त्या सभेचे छायाचित्र छापण्यावर भर असतो. प्रस्थापित शासनात असंतोष जागविण्यासाठी त्याचा उपयोग होतो.

व्यंगचित्रांमध्ये एखाद्या घटनेवर विनोदाच्या माध्यमाद्वारे रेखात्मक भाष्य केले जाते. राजकीय प्रक्रियेतील नेतृत्वाच्या हातून घडणारे राजकीय व्यवहार कसे आहेत याची जनमानसाला त्यामधून प्रतिमा माहिती होत असते. आर. के. लक्ष्मण, शंकर विजयन, मार्मिकचे ठाकरे बंधू यांची यासंदर्भात महत्त्वाची कामगिरी ठरली आहे. व्यंगचित्रे ही प्रत्यक्ष परिस्थितीचे वर्णन करणारी व बोलकी असतात.

**५) टीकात्मक चर्चासत्राचे अहवाल:–** राज्यव्यवस्थेतील विचारवंतांचे वेगवेगळ्या शैक्षणिक संस्थेमध्ये किवा सार्वजनिक ठिकाणी चर्चासत्राचे आयोजन केले जाते. त्याचा अहवाल तयार केला जातो. त्यामुळे राजकीय  व्यवस्थेला निर्णय घेणे सोयीचे जाते. म्हणून अशा चर्चासत्रांना संसूचनांमध्ये महत्त्व दिले जाते. व्यवस्थेला मार्गदर्शक ठरू शकणाऱ्या चर्चासत्राचे आयोजन लोकशाही प्रणित व्यवस्थेमध्ये केले जाते. शिक्षण, आरोग्य, समाज कल्याण या सार्वजनिक हिताच्या विषयावर खरी माहिती मिळविण्यासाठी त्याची मदत होते किंवा परिस्थिती उद्भवली तर त्यावर चर्चासत्रे आयोजित करून शासनाला आपला निर्णयात कसा बदल करायचा व कोणता बदल करायचा हे सांगितले जाते.

**६) राजकीय जाहिराती व निवेदने:–** राजकीय पक्षाच्या माध्यमातून आपल्या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी जाहिराती व निवेदने सादर केली जातात. त्याद्वारे संसूचनाचे कार्य केले जाते. तसेच राजकीय पक्ष जाहीरनामा, लोकगीते, परिपत्रक, निवेदन इत्यादीद्वारे लोकमत घडवण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच लोकमत बदलण्यासाठी त्याचा वापर केला जातो. लोकमत शांत करण्यासाठीही त्याचा वापर केला जातो. राजकीय पक्ष हे सभा, संमेलने आयोजित करून आपले लोकमत निर्माण करीत असतात. त्यामुळे समाजात राजकीय पक्षांची भूमिका समजून येते.

**७) चित्रपट व नाटके:–** ही मनोरंजनाची साधने असली तरी राजकीय संसूचनासाठी त्याचा उपयोग केला जातो. ती दृकश्राव्य स्वरूपाची असल्याने त्यांचा अधिक परिणाम होतो. या साधनांचे एक महत्त्वाचं

वैशिष्ट्य म्हणजे शिक्षित तसेच अशिक्षित या दोघांनाही याचा सारखाच फायदा होतो. याशिवाय मनोरंजनातून अधिक परिणामकारक संसूचन साधता येते. त्याद्वारे राजकीय शिक्षणाचा प्रसार केला जातो. अनेक नाटकामधून राजकीय परिस्थितीची जाणीव करून देणारे संवाद असतात. तसेच जी राजकीय व सामाजिक मूल्ये समाजात रूजवायची असतात अशा चित्रपटांना व नाटकांना सरकार संमती प्रोत्साहन देते नको असलेल्यां गोष्टीना परवानगी देत नाही.

**८) राजकीय नेते:–** राजकारणात विविध प्रकारचे नेते असतात. राष्ट्रीय प्रादेशिक पातळीवर लोकमत घडवणारे लोकमतावर प्रभाव पाडणारे नेते असतात त्यांना लोकप्रीय नेते म्हणतात. राजकीय संसूचनाच्या दृष्टीने त्याचे संसूचनाचे काम महत्त्वाचे असते. आपली राजकीय भूमिका लोकांना पटवून सांगणे विरोधकांचे भूमिका खोडून काढणे यासाठी ते विविध संसूचन साधनांचा उपयोग करीत असतात. स्वतः संसूचनाचे माध्यम या नात्याने काम करीत असतात. त्या राजकीय नेत्याप्रमाणे समाज सुधारक, धर्मगुरू हेही प्रमुख लोकमत घडविण्याचे काम करीत असतात. शिक्षक, तरुण मंडळी, कीर्तनकार यांचाही समावेश होतो.

अलीकडेच राष्ट्रीय पातळीवर असलेल्या नेत्यांच्या दौऱ्यावर भर दिला जातो. नेत्यांच्या वैयक्तिक प्रभाव जनतेला आकर्षित करतो. संसदीय शासनात तर पंतप्रधानाच्या दौऱ्याला महत्त्व असते. या दौऱ्यातून संसूचनास मोठ्या प्रमाणावर हातभार लागतो. जनतेशी प्रत्यक्ष संपर्क साधने व आपली भूमिका मांडणे हा दौऱ्याचा उद्देश असतो. राष्ट्रीय स्तरावरील विरोधी नेते याचा वापर करतात.

**९) विधिमंडळ सदस्य:–** संसूचनेच्या प्रक्रियेत विधिमंडळातील नेत्यांची भूमिका महत्त्वाची असते. कारण ते जनतेतून निवडून आलले असतात. त्यांना लोकमत घडविण्याचे व विविध विधिमंडळात लोकांचे प्रश्न मांडण्याचे काम करावे लागते. त्यांचा मतदारसंघात विविध संस्था, संघटना यांच्यासोबत संबंध येत असतो. विशेषतः स्वतःच्या राजकीय पक्षाचे अधिवेशनात ही प्रक्रिया अधिक घडते हे अधिवेशनात नेत्यांची निवड होत असते. त्या निवडीचा लोकांवर परिणाम होत असतो. लोकमत कसे बदलणार याचा अंदाज त्यामधून घेता येतो. तसेच पक्षशिस्त म्हणून स्वतः या सभासदांना कार्य करावे लागते. त्यामुळे त्या सदस्यांची संसूचन होण्यास त्याद्वारे मदत होते.

**१०) सरकारचा माहिती विभाग:–** शासनाच्या धोरणांची जनतेला माहिती व्हावी म्हणून स्वतंत्र माहिती विभाग निर्माण करण्यात आला आहे. या विभागामार्फत साहित्य, माहितीपत्रक, पुस्तके, जाहिराती इत्यादी साहित्य प्रसिद्ध केले जाते. वस्तुनिष्ठ माहिती दिली जावी यावर भर दिला जातो हे काम व्यवस्थित व्हावे यासाठी योग्य ती काळजी शासनाला घ्यावी लागते तसेच राजकीय पक्ष ही स्वतःची माहिती यंत्रणा उभी करण्याचा प्रयत्न करतात या माध्यमातून संसूचनाद्वारे योग्य माहितीचे प्रसारण जनतेपर्यंत केले जाते त्या आधारावर शासनाच्या निर्णयाला अनुकूल मत बनविण्यास मदत होते

**११) प्रत्यक्ष संपर्क, सभा, संमेलने:–** संसूचनासाठी प्रत्यक्ष संपर्क या आधारावर विचार केला जातो. प्रत्यक्ष संपर्क साधून विचारांची देवाणघेवाण होते, खुलासे होतात. विशिष्ट धोरण पटवून सांगण्यात येते. भेटी घेऊन संपर्क वाढविला जातो. तसेच सभा, संमेलने याद्वारे जवळीक निर्माण होते. लाख लोकांनी एखाद्या

नेत्याचे भाषण ऐकल्यावर त्याच्याविषयी जवळीक निर्माण होते. याचाही लोकमतावर परिणाम होतो व नेत्याला या माध्यमातून संसूचन करून योग्य उद्दिष्टे राजकीय व्यवस्थेत साध्य करता येतात. आकर्षक सभा मंच, रोषणाई, प्रभावी ध्वनिक्षेपक यंत्रणा यांचा वापर आणि सभेपूर्वी संगीताची योजना इत्यादीचा वापर करून पोषक वातावरण निर्माण केले जाते. त्यातून राजकीय संसूचन घडवून आणले जाते.

**१२) शासकीय, बिगर शासकीय समित्या :–** अनेक प्रसंगी समित्यांची स्थापना हा शासकीय कार्यवाहीचा भाग समजला जातो त्यामुळे अंतर्गत समित्या चौकशी समिती, सल्लागार मंडळी अशा स्वरूपाची रूपे संसूचन यंत्रणा धारण करीत असते विविध वादग्रस्त व महत्त्वाच्या प्रश्नासंबंधी नियुक्त करावे लागणारे शासकीय समितीवर तेथील परिस्थितीत समन्वय प्रस्थापित करण्याची जबाबदारी असते अशा प्रसंगी त्या समितीकडे शासनाचा प्रतिनिधी म्हणून पाहिले जाते व ती समिती शासनाची भूमिका समाजापर्यंत पोहोचवण्याचे व त्या मार्फत राजकीय संस्थेचे कार्य करीतच असतात

**१४) सोशल मिडिया:–**

आज डिजिटल युगात माध्यमांच्या विविधतेमुळे, राजकीय संवादात आता सोशल मीडियासारखे ऑनलाइन प्लॅटफॉर्म, यु ट्यूब, ट्विटर, मेटा प्लॅटफॉर्म आणि ऑनलाइन न्यूज वेबसाइट्स सारख्या सेवांवरील मोफत ऑनलाइन न्यूज चॅनेल देखील समाविष्ट आहेत. या सर्व माध्यमांच्या सहाय्याने लोक माहिती एकमेकांना पाठवीत असतात. त्यातून सरकारच्या विरोधात व सरकारच्या बाजूने भूमिका मांडत असतात. त्यामुळे जगभरात कोठेही घडलेली घटना ही क्षणामध्ये सर्वांपर्यंत पोहचते. त्यामुळे सोशल मिडिया हे एक महत्वाचे संसूचन साधन म्हणून काम करीत आहे.

## २.३ सारांश

राज्यशास्त्राच्या आधुनिक राजकीय विश्लेषणामध्ये ज्या अनेक संकल्पना उदयास आल्या त्यातील राजकीय संसूचन ही संकल्पना महत्त्वाची आहे. राजकीय संसूचनेमध्ये राजकीय माहिती ही लोकांपर्यंत पोहोचवण्याचं काम करीत असते. त्यासाठी वेगवेगळे माध्यम वापरले जातात. वृत्तपत्रे, रेडिओ, दूरचित्रवाणी, इंटरनेट, मासमिडिया अशा अनेक गोष्टीच्या माध्यमातून शासनाच्या ज्या काही योजना आहेत, जे काही निर्णय आहेत ते सर्व निर्णय हे लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करत असतात आणि लोकांच्या प्रतिक्रिया या त्याच वृत्तपत्राच्या, टीव्हीच्या माध्यमातून सरकारपर्यंत पोहोचवण्याचं काम केले जाते. या राजकीय संसूचनमध्ये कार्ल ड्वाईश हा विचारवंत महत्त्वाचा आहे. त्याने ज्या डेव्हिड ईस्टन यांच्या राजकीय व्यवस्था या सिद्धांताची पुढचे स्वरूप म्हणून उदयास आलेला हा विचार आहे. आदान, प्रदान, प्रत्यादान या तत्त्वाप्रमाणे ह्या राजकीय संसूचनचे काम चालते. एकूणच राजकीय संसूचन हे एक राज्यशास्त्रातील आधुनिक राजकीय विश्लेषणाचा महत्त्वाचा भाग आहे.

## २.४ पारिभाषिक शब्द

संसूचन – संवादाची देवाण घेवाण

भार – माहितीचे संख्यात्मक प्रमाण

गतिरोध – माहिती पोहचण्यास झालेला विलंब

## २.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१. राजकीय संसूचनेचे जनक कोणास म्हटले जाते?

२. राजकीय संसूचनेत राज्यशास्त्रांच्या दृष्टीने महत्त्वाचा विचारवंत कोण?

३. कार्ल ड्वाईशने कोणत्या पुस्तकामध्ये राजकीय संसूचनाचा दृष्टीकोन मांडला आहे?

४. आधुनिक काळामध्ये राजकीय संसूचनाचे प्रभावी माध्यम कोणते?

## २.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. नॉर्बट वायनर

२.कार्ल ड्वाईश

३. The Nerves of Government

४. सोशियल मिडिया

## २.७ सरावासाठी स्वाध्याय

१. राजकीय संस्थेचे अर्थ,व्याख्या व स्वरूप स्पष्ट करा.

२. राजकीय संसूचनाचे प्रकार सांगा.

३. राजकीय संसूचनाचे कार्ल ड्वाईशयांनी सांगितलेल्या तत्त्वांची चर्चा करा.

४. राजकीय संरचनेचा विकास स्पष्ट करा

५. राजकीय संसूचनेची साधने कोणती आहेत त्याची सविस्तर चर्चा करा.

## २.८ संदर्भ ग्रंथ

१. Johari, J. C. (२०११) Comparative Politics, Sterling Publishers Private Limited, New Delhi

२. इनामदार व वकील, (संपा) (१९८४) आधुनिक राजकीय विश्लेषण, शुभदा सारस्वत पब्लिकेशन्स प्रा.लि. पुणे

३. आवारी, विलास व देवरे सुरेश, (२०११) आधुनिक राजकीय विश्लेषण, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे

४. खंडागळे चंद्रकांत (२०२१) राजकीय समाजशास्त्र, मायादेवी खंडागळे प्रसाद ग्राफिक्स, सांगली

❑❑❑